MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५

व्ही.पी.एम्.

# दिशा



वर्ष चोविसावे / अंक १ / जानेवारी २०२३

## संपादकीय

## इंडियन सायन्स काँग्रेसचे १०८ वे अधिवेशन

इंडियन सायन्स काँग्रेस असोसिएशन (Indian Science Congress Association) ही भारतीय शास्त्रज्ञांची संघटना आहे. या संघटनेच्यावतीने दरवर्षी भारतातील एका शहरात अधिवेशन आयोजित करण्यात येते. हे अधिवेशन जानेवारी महिन्याच्या सुरुवातीला भरविण्यात यावे असा मागील अनेक वर्षांपासूनचा शिरस्ता आहे. या वर्षीचे अधिवेशन नागपूर शहरातील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या आवारात जानेवारी ३ ते ७, २०२३ या कालावधीत आयोजित करण्यात आले होते. या अधिवेशनाचे उद्घाटन भारताचे पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांनी दूरस्थ पद्धतीने ३ जानेवारीला केले. या अधिवेशनाच्या निमित्ताने एका मोठ्या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. प्राईड ऑफ इंडिया असे समर्पक नाव दिलेल्या या प्रदर्शनात भारतीय संस्थांनी मागील काही वर्षांत साध्य केलेल्या प्रगतीचा लेखाजोखा सादर करण्यात आला होता. यामध्ये सरकारी संस्था, तसेच खाजगी उद्योगांनी उत्साहाने भाग घेतला होता. त्यातील एक दालन तर भारतीय महिला शास्त्रज्ञांचे विज्ञान आणि तंत्रज्ञान यातील सहभाग याची माहिती देण्यासाठी वापरले गेले होते. या प्रदर्शनाला भेट देणाऱ्या व्यक्तीला भारतीय विज्ञान आणि तंत्रज्ञानाची चांगली कल्पना येईल याची पुरेपूर काळजी घेण्यात आली होती.

नागपूर शहरात भरलेले हे इंडियन सायन्स काँग्रेसचे १०८ वे अधिवेशन होते. इंडियन सायन्स काँग्रेसची स्थापना देशाला स्वातंत्र्य मिळण्याच्या बरेच आधी झाली. कलकत्ता शहरातील काही विचारवंतानी त्यासाठी पुढाकार घेतला होता. त्यांची ही कल्पना ब्रिटिश वैज्ञानिकांनी उचलून धरली. ब्रिटिश असोसिएशन फॉर दि ॲडव्हान्समेंट ऑफ सायन्स (British Association for the Advancement in Science) या संस्थेसारखी एखादी संस्था भारतात असावी अशी त्यांची इच्छा होती. प्राध्यापक जे. एल. सिमोनसेन आणि प्राध्यापक पी. एस. मॅकमोहन या दोन रसायनशास्त्रज्ञांनी या संस्थेच्या स्थापनेत विशेष रस घेतला. १९१४ साली कलकत्ता शहरात या संघटनेची रीतसर स्थापना झाली. या संस्थेचे मुख्यालय अजुनही कलकत्ता शहरातच आहे. आता केंद्र सरकारच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाच्या अधिपत्याखाली ही संघटना काम करते. देशातील विज्ञान संशोधन कार्याला बळकटी यावी यासाठी प्रयत्न करणे हे

(पृष्ठ क्र. २ वर)

(मुखपृष्ठावरून - **संपादकीय**)

या संस्थचे मुख्य उद्दीष्ट आहे. विज्ञानाचे विद्यार्थी, प्राध्यापक, संशोधक, तसेच विज्ञान प्रसारक या संघटनेचे सभासद होऊ शकतात. आजच्या घडीला या संघटनेचे ३०,००० हून अधिक सभासद आहेत.

संघटनेच्या स्थापनेपासून आजतागायत अखंडपणे दरवर्षी अधिवेशनाचे आयोजन करण्यात येत आहे. पहिले अधिवेशन १५ ते १७ जानेवारी १९१४ या कालावधीत कलकत्त्याच्या एशियॅटिक सोसायटीत आयोजित करण्यात आले होते. कलकत्ता विद्यापीठाचे त्यावेळचे कुलगुरू सर आशूतोष मुखर्जी हे त्या अधिवेशनाचे अध्यक्ष होते. या संघटनेचे १०० वे अधिवेशन जानेवारी २०१३ मध्ये कलकत्ता शहरातच भरविण्यात आले होते. त्यावेळचे भारतीय पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांच्या उपस्थितीत भारताचे राष्ट्रपती श्री प्रणब मुखर्जी यांनी त्या अधिवेशनाचे उद्घाटन केले होते. ‘भावी भारताच्या जडणघडणीत विज्ञानाचे योगदान’ या विषयावर त्या अधिवेशनात चर्चा करण्यात आली होती.

दरवर्षी अधिवेशनासाठी एक विशेष विषय घेण्यात येतो. यावर्षीचा विषय होता ‘शाश्वत विकासासाठी महिलांचे सबलीकरण’. या अधिवेशनासाठी देश-विदेशातील शास्त्रज्ञ नागपूर शहरात गोळा झाले होते. या अधिवेशनात अनेक विषयांवर सांगोपांग चर्चा झाली. वर सांगितल्याप्रमाणे विषयावर या अधिवेशनात एक विशेष प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. त्याचबरोबर मुलांसाठी एक खास प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. या अधिवेशनाचे आणखी एक वैशिष्ट्य असे की, यात ‘शेती विज्ञान’ या विषयावर चर्चासत्राचे आणि प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. त्याचबरोबर ‘आदिवासी विज्ञान’ या विषयावर चर्चासत्राचे आणि प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते.

याआधी १९७४ साली इंडियन सायन्स काँग्रेसचे अधिवेशन नागपुरात भरले होते. त्या अधिवेशनाच्या निमित्ताने एका विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी मी त्याच शहरात एम. एससी. चे शिक्षण घेत होतो. आमच्या विभागातील काही निवडक विद्यार्थ्यांना या प्रदर्शनात सहभागी होण्यासाठी पाचारण करण्यात आले होते. ही संधी साधून मी त्या प्रदर्शनात सक्रिय सहभाग घेतला होता. अतिशय सोप्या पद्धतीने, ‘रंगीबेरंगी स्फटिक कसे बनवावेत?’ यांचे दिग्दर्शन मी केले होते. त्यातून मला खूप शिकायला मिळाले. अनेक शास्त्रज्ञांशी चर्चा करण्याची दुर्मीळ संधी मला मिळाली. त्यातूनच विज्ञान संशोधनाची वाट धरण्याचा विचार पक्का झाला.

समाजात विज्ञानाचा प्रसार व्हावा आणि नवीन पिढीतील लोक वैज्ञानिक संशोधनाकडे आकर्षित व्हावेत या उद्देशाने राष्ट्रीय स्तरावर हे संमेलन आयोजित केले जाते. हा उद्देश खरोखरच सफल होतो किंवा नाही याची शहानिशा करण्याची गरज आहे. बऱ्याचदा संमेलनानंतर वाद-प्रतिवाद याला ऊत येतो असे आढळते. काही वर्षांपूर्वी मुंबईत झालेल्या अधिवेशनात आधाराशिवाय भारतीय विज्ञानाचा गाजावाजा केल्याची चर्चा बरेच दिवस रंगत राहिली. नागपूर अधिवेशनात देखील महिला शास्त्रज्ञांचा हळदीकुंकवाचा कार्यक्रम वर्तमानपत्रात गाजला. या बाबींना फारसे महत्त्व न देता समाजात वैज्ञानिक दृष्टीकोन कसा वाढेल यावर लक्ष केंद्रित केले तरच अधिवेशनाचा उद्देश सफल होईल असे मला वाटते.

**– डॉ. सुधाकर आगरकर**

•••

व्ही.पी.एम्.

# दिशा

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५



**वर्ष चोविसावे/अंक ७/जानेवारी २०२३**

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष २७ वे/अंक ७ वा)

**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**

**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
Email:perfectprints@gmail.com

## *अनुक्रमणिका*

| | | |
|---|---|---|
| १) संपादकीय | डॉ. सुधाकर आगरकर | |
| २) पद्यानुवादांचा रसास्वाद | नरेंद्र गोळे | ३ |
| ३) तमाच्या तळाशी दिवे लागले... | डॉ. आनंद कुलकर्णी | ८ |
| ४) मदनलाल धिंग्रा यांचे अपूर्व शौर्य | संकेत कुलकर्णी | १० |
| ५) वकिली व्यवसाय : काल, आज आणि सर्वांचे काय? | प्रा. विनोद एच वाघ | १२ |
| ६) असत्यमेव जयते? एक पुस्तक परीक्षण | शेफाली वैद्य | १५ |
| ७) कांतारा - या मातीतला सुंदर चित्रपट | राजेश कुलकर्णी | १८ |
| ८) परिसर वार्ता | संकलित | २१ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून, त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. 'दिशा'च्या संदर्भात

- आपण 'दिशा' नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- हे व्यासपीठ **अभ्यासपूर्ण लेखांसाठी** आहे.
- शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून 'दिशा'ला सहकार्य करू शकता.
- आपण स्वत: देणगी मूल्य देऊ शकता व इतरांना सांगा.
- आपले देणगी मूल्य द्यायचे राहिले नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- दिशाच्या संदर्भात देणगी मूल्य, लेख पाठवावयाचे असतील तर ते कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, नौपाडा, ठाणे - ४००६०२ या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
- आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेकडून देणगीमूल्य पाठवावे.
- www.vpmthane.org या संकेतस्थळावर 'दिशा'चे जुने अंक आपण पाहू शकता.
- वार्षिक देणगी मूल्याचा रु. ५००/- चा धनादेश 'विद्या प्रसारक मंडळ A/C दिशा' या नावाने पाठवावा.
- कृपया वर्गणीदार व्हावे.

- संपादक

# पद्यानुवादांचा रसास्वाद

*पद्यानुवादांचा आस्वाद कसा अनुभवावा याचे विवेचन या लेखात केले आहे. - संपादक*

मी मनोगत डॉट कॉम या संकेतस्थळावर कार्यरत असल्यापासून, बरेच पद्यानुवादात्मक लेखन केलेले आहे. त्या साऱ्या लेखनाचा आढावा घेत असतांना मला जाणवले की, पद्यानुवादांप्रतीचा सगळ्यांचाच दृष्टीकोन फारसा उत्साहवर्धक नाही. तसा तो असावा असे मला वाटते. मग अडचण काय आहे? तर पद्यानुवादात कशाकशाचा आस्वाद घ्यायचा याची सामान्य वाचकास पुरेशी जाण नसते. तो आवडले तर आवडले म्हणतो. पण पद्यानुवाद आणखीही होत राहावेत ह्याबाबत आग्रही नसतो. ज्यांना ते आवडत नाहीत, ते मात्र 'पद्यानुवाद होणे थांबेल कसे?' ह्याबाबत अत्यंत आग्रही दिसून येतात. असे का व्हावे? पद्यानुवाद लोकांना नको असतात का? याचा शोध मला वेगळ्याच तथ्यांप्रत घेऊन गेला. त्या शोधाचे फलीत आपणाप्रत पोहोचवावे अशी उमेद धरून हे लिहीत आहे. आपल्याला आवडावे हीच प्रार्थना.

अनुवादात, इतर भाषांत अभिव्यक्त झालेल्या रचनांमधील आनंद कुणीतरी आपल्या मातृभाषेत आणून देऊ इच्छित असतो. सर्वसामान्य लोकांना अनुवादांतला आनंद घेण्याची उपजत इच्छा असतेच. गद्यापेक्षा पद्य साहित्य जास्त रुचकर असते. कदाचित त्याच्या गेयतेमुळे असेल, पण बरेचदा ते संक्षिप्त, सारमय आणि अनुभूतीच्या यथातथ्य अभिव्यक्तीमुळे आस्वादकास पद्य आवडू लागते. एकदा का आवडले की मग निसर्गतःच ते दुसऱ्याला सांगण्याची प्रवृत्ती होते. ऐकणाऱ्याची भाषा वेगळी असली तरीही सांगणाऱ्याचा हुरूप कमी होत नाही. मग जे गद्यात समजवून सांगता येत नाही किंवा अपुरे वाटते, ते मग त्या भाषेत पद्यात सांगण्याचा प्रयास होऊ लागतो आणि पद्य अनुवाद जन्माला येतो.

पद्यानुवाद कशाकरता आस्वाद्य असू शकतात? एक यादीच करू या!

१. इतर भाषेतल्या पद्याचे आकलन होण्याचा आनंद म्हणजेच अर्थानुवादातील आनंद.

२. त्या मूळ पद्यातील भाव-भावनांशी सहानुभूत होण्यातला आनंद. भावानुवादातील आनंद.

३. त्या मूळ भाषेतल्या शब्दांच्या पदलालित्याच्या व शब्दरचनेच्या आस्वादातील आनंद.

४. त्या मूळ पद्यातील नाद, लय, सूर, ताल इत्यादी. सांगीतिक आकलनातील आनंद.

५. त्या मूळ पद्यातील गेयता अनुवादाच्या भाषेत आणता आली तर त्यातील आनंद.

पद्यानुवाद कायमच विवादास्पद राहण्याचे एक कारण म्हणजे गेयतेतील आनंद त्यात शोधू पाहणाऱ्यांच्या पदरी पडणारी निराशा हेच आहे. अनुवादकर्ता अनुक्रमे अर्थ, भाव, पदलालित्य, सांगीतिक अभिव्यक्ती आणि गेयता साधण्याचा प्रयत्न करत असतो. प्रत्येक पातळीवर त्याला कमी अधिक प्रमाणात ते साधते. अनुवादकाच्या मगदुराप्रमाणे, मूळ गीताच्या दर्जाप्रमाणे आणि अनुवादकाने साधलेल्या मूळ गीताप्रतीच्या तन्मयतेनुरूप अनुवाद, वरील पाच पातळ्यांवर साधला जातो. तेव्हा हे उघडच आहे की, सर्वोच्च पातळीवरील गेयता सर्वात अधिक क्षतिग्रस्त ठरते. आस्वादक जर तिथेच आनंद शोधू लागला तर, पद्यानुवाद आस्वाद्य होत नाही. मग 'साहिर लुधियानवीच्या ताजमहालाला आपली वीट जोडू नका' अशा स्वरूपाचे आक्रमक प्रतिसाद मिळू

लागतात. त्यातून अनुवादकाच्या क्षमतेवर जी टिप्पणी होत असते तिची दखल तो घेतोच. पण अशा प्रतिसादातून आस्वादकाची उत्तम सांगीतिक जाण व्यक्त होते. किंबहुना असे प्रतिसाद उत्तम सांगीतिक जाण असणाऱ्यांकडूनच मिळत आलेले आहेत.

इथे याचा विचार करण्यासारखा आहे की, जेवढे मूळ गीत अधिक लोकप्रिय, तेवढेच त्याचे रचयिते जास्त गुणाढ्य असतात. उत्तम शब्दरचना, अनुपम संगीत आणि अलौकिक गायन यांनी अलंकृत मूळ गीताचा पद्यानुवाद एक साधा अनुवादक करतो; तेव्हा तो प्रथम कवी, मग संगीतकार आणि नंतर गायकही बनण्याचा प्रयत्न करत असतो. ज्यांना पद्यानुवाद करण्याची इच्छा असते ते बहुधा लेखक/कवी/गीतरचना अशा क्षेत्रात उमेदवारी करणारे लोक असतात. संगीत आणि गायन यांतील त्यांचे नैपुण्य यथातथाच असते. म्हणून पद्यानुवाद सामान्यतः पहिल्या तीन पायऱ्यांवर सर्वात अधिक आस्वाद्य असतात. नंतरच्या पायऱ्यांवरील यश केवळ बोनस. बहुधा ते मिळतच नाही. अपवाद वृत्तबद्ध, छंदबद्ध काव्याचा.

मूलभूत प्रेरणाः अभिव्यक्तीतील आनंद
आई, आई पाहा जरा, गंमत नामी किती अहा!
चांदोबा खाली आला, हौदामध्ये बघ बुडला
कसा उतरला किंवा पडला, की धडपडला,
कशास उलटे चालावे, पाय नभाला लावावे?

ह्या ओळींमध्ये काहीतरी प्रकर्षाने सांगायचे आहे, दाखवायचे आहे. कुणितरी निकटच्या माणसाने आपल्या अनुभवाशी सहमत व्हावे, सहानुभूत व्हावे ह्याची तीव्र इच्छा आहे. का? तर सहानुभूत लोकांच्या आनंदातील सहभागाने, आपलाच आनंद द्विगुणित होतो म्हणून! अगदी तशीच आदिम प्रेरणा, इतर भाषेतील पद्यांत आपल्याला आढळलेला आनंद, स्वभाषेतील सुहृदांस सादर करणाऱ्या पद्यानुवादकास असते.

**अर्थानुवाद**

खरे तर मूळ पद्याचा गद्य अनुवाद आणि मग अनुवादित गद्याची पद्य रचना अशा दोन पायऱ्यांनी नवे पद्यानुवाद तयार होत असतात. बाजारात अनेक सार्थ गीता मिळतात. त्या म्हणजे अर्थानुवाद. याच पहिल्या पायरीवर सार सांगून झालेले असते. अर्थानुवाद गद्य असू शकतो.

**पद्यानुवाद**

मग दुसऱ्या पायरीचा सोस का? तर सार म्हणजेच सर्वस्व नव्हे. त्यासोबतचे रचनासौंदर्य, गेयता इत्यादी अनेक सुसंगतींची आस्वाद्यताही अनुवादकाला वाचकास/श्रोत्यास/दर्शकास लक्षात आणून द्यायची असते. त्या अनुभूतीतला आनंद मिळवून द्यायचा असतो. ते साधते कितपत, हे अनुवादकाच्या सामर्थ्यावर अवलंबून असते. अत्यंत समर्थ अनुवादकांनाही खरे तर शंभर टक्के साधत नाहीच. सर्वसामान्य अनुवादकास ते साधावे कसे? आणि मग नसेल साधणार तर त्याने तसा प्रयत्न उगाचच का करावा? आता मला सागरमाथा (एव्हरेस्ट) चढता येत नाही म्हणून मी तो चढण्याचे स्वप्नच पाहू नये का? अशासारखाच हा प्रश्न आहे. उत्तरही तसे सोपेच आहे. हरएकाने अवश्य प्रयत्न करावा. त्याला कितपत साधला ते लोक सांगतीलच. मात्र, जितपत साधेल तितपत तो दुसऱ्यास काहीतरी आनंद मिळवून देऊ शकणार आहे. हे नक्कीच साधणार आहे.

आता प्रश्न हा आहे की, कुठला आनंद? विनोबा भाव्यांनी गीता वाचली. आत्मसात केली. तिच्यावर प्रवचने दिली. मात्र गीता ही जीवनाचे तत्त्वज्ञान कसे व्यवस्थित समजवून सांगते हे त्यांना त्यांच्या आईलाच सांगायची पाळी जेव्हा आली, तेव्हा त्यांना समश्लोकी पद्य रचनाच जास्त समर्पक वाटली. विनोबा आईला गीता प्रवचनही देऊ शकले असते आणि मराठीतून सांगितलेले ते तत्त्वज्ञान आईला समजलेही असते. ते

समजून तिला जे कळायचे ते कळलेही असते आणि व्हायचा तो यथोचित आनंदही झाला असता. पण गीतेत केवळ प्रतिपाद्य विषयच नाही तर रचना सौंदर्य आहे, गेयता आहे, शब्दांचा नेमकेपणा आहे, शब्दांचा मोजकेपणा आहे, नाद आहे आणि लयही आहे. ह्या साऱ्यांचा आस्वाद जसा मला संस्कृतातून गीता वाचताना घेता आला तसा आस्वाद आईला घेताच येणार नाही का? हा सल विनोबांना पद्य रचनेसाठी प्रवृत्त करण्यास कारण ठरला असावा. त्यांना ते साधलेही मोठ्या प्रमाणात आहे व म्हणून ते आईला समाधानही अपार देऊ शकले आहेत.

स्वैर पद्यानुवाद : भावार्थदीपिका, अर्थात ज्ञानेश्वरी (टीका, टिप्पणी, भावार्थदर्शन, भाष्य, समीक्षा)

ज्ञानेश्वरीचा उद्देश गीतेचा भावार्थ विशद करणे हा आहे. नावातच तसे सांगितले आहे. एक प्रश्न असाही आहे की, भाष्याला अनुवाद समजावे का? भाष्य जर मूळ काव्याच्याच भाषेत असेल तर समजण्याची गरजच नाही. मात्र मूळ काव्याच्या भाषेव्यतिरिक्त भाषेत केलेल्या भाष्यासही अनुवादच म्हणायला हवे.

त्यासाठी पद्याचाच आकृतीबंध ज्ञानेश्वरांनी अवलंबला आहे. मूळ काव्यातील प्रासादिकता वाचकांप्रत पावती करावी हाच त्यापाठीचा उद्देश दिसतो. मात्र विनोबांप्रमाणे समश्लोकी आकृतीबंध निवडलेला नाही. अनुष्टुभ छंदात पुरेसे स्वातंत्र्य मिळत नसल्याने असेल किंवा ओवीच्या आकृतीबंधावर हुकुमी अधिकार सिद्ध झालेला असल्याने असेल ज्ञानेश्वरांनी ओवी हा प्रकार अभिव्यक्तीसाठी निवडला. शेवटलाच पर्याय जास्त समर्पक वाटतो. जे स्वातंत्र्य त्यांना अभिप्रेत होते त्याचाही त्यांनी प्रच्छन्न वापर केला आहेच. एक एका श्लोकासाठी अनेक ओव्यांचा समूह लिहून अर्थ विशद केला. तत्कालीन मराठीच्या वाचकांना तो अपार भावला, मान्यता पावला. ह्यासाठीच ह्या अनुवादाचे वर्गीकरण करायचे तर ते स्वैर पद्यानुवाद म्हणूनच करावे लागेल. उदाहरणार्थ : गीतेतील पहिल्या श्लोकापूर्वीच ज्ञानेश्वरीत ८४ ओव्या प्रस्तावनेत खर्ची पडल्या असून, गीतेतील पहिल्या श्लोकाच्या अर्थाकरता तीन ओव्या वेचल्या आहेत.

धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे समवेता युयुत्सवः ।
मामकाः पाण्डवाश्चैव किममुर्वत संजय ।। १ ।।

तरी पुत्रस्नेहे मोहितू । धृतराष्ट्र असे पुसतू ।।
म्हणे संजया सांगे मातू । कुरुक्षेत्रींची ।। ८५।।
जें धर्मालय म्हणिजे । तेथ पांडव आणि माझे ।
गेले असती व्याजें । झुंजाचेनी ।। ८६।।
तरी तिहीं येतुला अवसरीं। काय किजत असे येरयेरीं।
तें झडकरी कथन करी। मजप्रती ।। ८७।।

विकिपेडीयावर ज्ञानेश्वरीबाबत पुढील माहिती दिलेली आहे. ज्ञानेश्वरी हा ग्रंथ महाराष्ट्रातील संत ज्ञानेश्वरांनी बाराव्या शतकात लिहिला. शके १२१२ (इ.स.-१२९०) मध्ये प्रवरातीरी असणाऱ्या नेवासे या गावातील मंदिरात, एक खांबाला टेकून भगवद्‌गीतेवर ज्ञानेश्वरांनी जे भाष्य केले, त्यालाच ज्ञानेश्वरी किंवा भावार्थदीपिका म्हटले जाते. सर्वसामान्यांसाठी असणारा गीतेवरील ज्ञानेश्वरांचा हा टीकाग्रंथ, मराठीतील सर्वश्रेष्ठ ग्रंथ आहे. मराठीतील गोडवा अन्य भाषिकांना कळावा या उद्दीष्टाने संस्कृत(गीर्वाण), हिंदी, कन्नड, तमिळ, इंग्रजीबरोबरच २१ निरनिराळ्या भाषांमध्ये ज्ञानेश्वरी भाषांतरीत झाली असून, त्याचे मुद्रित ग्रंथ उपलब्ध आहेत.

इथे आणखीही एक मुद्दा पद्यानुवादांच्या रसग्रहणाखातर उघड झाला आहे. जर अनुवादित काव्याचा विषयभागच केवळ महत्त्वाचा असता तर गीतेचा मराठी अनुवाद ज्ञानेश्वरीत केल्यानंतर पुन्हा ज्ञानेश्वरीचा अनुवाद संस्कृतात करण्याची गरज न भासती. आता संस्कृतातला ज्ञानेश्वरीचा अनुवाद पद्यानुवाद आहे

---

अहंकारात सर्वात वाईट गोष्ट ही आहे की अहंकार तुम्हाला हे कधीच जाणवू देत नाही की, तुम्ही चुकीचे आहात!

किंवा नाही ते मला माहीत नाही. मात्र तो तसा असल्यासही नवल वाटणार नाही. कारण पद्यानुवाद करण्यामागची मूळ प्रेरणा आपल्याला झालेल्या आनंदात इतरांना सहभागी करून घेण्याचीच आहे.

**सैल पद्यानुवाद**

एका कडव्याखातर अनेक कडवी, प्रसंगी भिन्न वृत्तात, छंदात, तालात रचून पद्यात अनुवाद लिहिला तर त्यास सैल पद्यानुवाद म्हणावा लागेल. ज्ञानेश्वरीलाही सैल पद्यानुवाद म्हणता आले असते, पण त्यात भाष्य समाविष्ट असल्याने ते स्वैर म्हणावे लागेल. मेघदूत या कालिदासाच्या मूळ संस्कृत महाकाव्याचा कुसुमाग्रजांनी केलेला मराठी अनुवाद अन्य वृत्तात केलेला आहे. श्री. चिंतामण द्वारकानाथ देशमुख (आपल्या भारत देशाचे पहिले अर्थमंत्री. हेच पाकिस्तानचेही पहिले अर्थमंत्री होते.) यांनी केलेला मेघदूताचा मराठी अनुवाद मात्र मूळ संस्कृत महाकाव्याप्रमाणेच मंदाक्रांता वृत्तातच लिहिलेला असून, सुरस वठला आहे. त्याला सैल पद्यानुवाद म्हणता येणार नाही.

तस्मिन्नद्रौ कतिचिदबलाविप्रयुक्तः स कामी ।
नीत्वा मासांकनकवलयभ्रंशरिक्तप्रकोष्ठः।।
आषाढस्य प्रथमदिवसे मेघमाश्रिलष्टसानुं ।
वप्रक्रीडापरिणतगजप्रेक्षणीयं ददर्श ।।२।।
पूर्वमेघ – कालीदासाचे मूळ संस्कृत काव्य

प्रेमी कांता–विरही अचली घालवी मास काही ।
गेले खाली सरूनी वलय स्वर्ण हस्ती न राही।।
आषाढाच्या प्रथम दिनी तो मेघ शैलाग्री पाहे ।
दंताघाते तटी गज कुणी भव्यसा खेळताहे ।।२।।

पूर्वमेघ – देशमुखांचा समवृत्त संस्कृतप्रचुर मराठी अनुवाद (देशमुख संस्कृतचे जगन्नाथ शंकरशेठ शिष्यवृत्तीधारकच होते.)

कृश हातांतून गळून पडले सोन्याचे कंकण ।
कामातुर हो हृदय, कामिनी दूर राहिली पण! ।।
आषाढाच्या प्रथम दिनी त्या दिसे पर्वतावरी ।
नयनरम्य घन, करी कड्यांवर गज वा क्रीडांगण! ।।२।।
पूर्वमेघ – कुसुमाग्रजांचा भिन्नवृत्ती मराठी अनुवाद (चालः औदुंबर)

सम मंथ्स वेअर गॉन, द लोनली लव्हर्स पेन ।
हॅड लूज्ड हिज गोल्डन ब्रेसलेट डे बाय डे ।।
अर ही बिहेल्ड द हरबिंजर ऑफ रेन ।
अ क्लाऊड दॅट चार्ज्ड द पीक इन मिमिक फ्रे ।।
ऍज ऍन एलिफंट ऍटॅक्स अ बँक ऑफ अर्थ इन प्ले ।।२।।
पूर्वमेघ – देखमुखांचा समकालीन इंग्रजी अनुवाद

देशमुखांची समकालीन इंग्रजीवरही चांगलीच पकड होती. त्यांनी मूळ संस्कृत मेघदूताचा सरस इंग्रजी अनुवादही केला आहे. तो मात्र समवृत्त तर नाहीच, शिवाय प्रत्येक चार ओळींचे मूळ कडवे इंग्रजी अनुवादात पाच ओळींचे लिहिले आहे. म्हणून इंग्रजीतील हा अनुवाद निस्संशयपणे सैल पद्य अनुवादाचे उदाहण म्हणून सांगता येईल.

**भिन्नवृत्ती पद्यानुवाद**

आता वर दिलेल्या कुसुमाग्रजांच्या पद्यानुवादाकडे जर बारकाईने पाहिले तर तो कुठल्याच अंगांनी सैल वाटणारा नाही. यथातथ्य आणि सुरस आहे. पण भिन्नवृत्ती आहे. ज्या वृत्तात तो लिहिला आहे त्या वृत्तात सुरेख बसला आहे. तरीही गाण्याच्या अंगाने आस्वाद घेणाऱ्यांना, मुळात मंदाक्रांता वृत्तात लिहिलेला मजकूर, इतर वृत्तात तेवढाच गेय राहत नाही किंवा तेवढाच आनंददायी राहत नाही. म्हणून तो कमी लोकप्रिय होतो. कुसुमाग्रजांचा मेघदूताचा अनुवादही, ह्या कारणानेच मला देशमुखांच्या अनुवादापेक्षा कधीच सरस वाटला नाही, जरी कित्येकदा देशमुखांचा अनुवाद अगदीच संस्कृतमय झालेला आहे तरी.

---

जगात तीच लोकं पुढे जातात जे सूर्याला जागे करतात आणि तीच लोकं पाठीमागे राहतात ज्यांना सूर्य जागं करतो!

भिन्नवृत्ती अनुवाद करण्यात मनोगती व्यक्तीरेखा टवाळ यांचा हातखंडा आहे. हिंदीतील अत्यंत लोकप्रिय गीताचा; समर्थ, पण भिन्नवृत्ती पद्यानुवाद त्यांनी केला. संगीताच्या अंगाने पाहणाऱ्यांकरता, तो काही पूर्ववत रंजक राहिला नसावा. मात्र त्याच गीताचा माफीचा साक्षीदार यांनी व मी केलेला समवृत्त अनुवाद, सरस नसला तरी केवळ समवृत्त असल्याने सहज स्वीकारार्ह झाला आहे.

यूँ तो हमने लाख हंसीं देखे हैं ।
तुमसा नहीं देखा, हो, तुमसा नहीं देखा ।।धृ।। मूळ हिंदी लोकप्रिय गीत

सुंदर तरुणी फार बघितल्या होत्या।
पण असल्या नव्हत्या ।।धृ।। – माफीचा साक्षीदार यांनी केलेला समवृत्ती अनुवाद

मी तर असल्या लाख पऱ्या पाहिल्या।
तुजपरी न पाहिली ।।धृ।। – मी केलेला समवृत्त अनुवाद

पाहिल्या आहेत लाखो, आजवर मी सुंदरी ।
पाहिली ना तुज परी ।।धृ।। – टवाळ यांनी केलेला भिन्नवृत्ती अनुवाद

चालः कायदा पाळा गतीचा, काळ मागे लागला, थांबला तो संपला, थांबला तो संपला

त्यांनी लिहिला त्या चालीत अनुवाद अगदी चपखल बसला आहे. सुरेख गाताही येतो आहे. मात्र नव्या चालीत. मूळ गाण्याच्या लोकप्रियतेमुळे अशा सरस अनुवादाची स्वीकारार्हता अकारणच कमी होते. असेच आणखीही एक उदाहरण देता येईल.

न मुँह छुपा के जियो, और न सर झुका के जियो।

गमों का दौर भी आये, तो मुस्कुरा के जियो ।। धृ।। – मूळ हिंदी लोकप्रिय गीत

न तोंड लपवून जगा, आणि न मान ही झुकू द्या।
की दुःख कोसळो कितीही, तुम्ही हसून जगा ।। धृ ।। – मी केलेला समवृत्ती अनुवाद

घाबरूनी तू मुखाला, लपविणे नाही बरे ।
लाजुनी तू मस्तकाला, झुकविणे नाही बरे ।।
काळ हा आला समोरी, दुःख घेऊनी जरी ।
जीवनीच्या या सुखांना, हरवणे नाही बरे ।। धृ ।। – ''मी राधिका'' यांचा भिन्नवृत्त अनुवाद

चाल : कायदा पाळा गतीचा, काळ मागे लागला, थांबला तो संपला, थांबला तो संपला.

**भावानुवाद**

वृत्त सुटले तरी चालेल, पण भाव घट्ट धरून ठेवायचा. ह्या वृत्तीने अनुवाद केल्यास भावानुवाद होतो. वरील मी राधिका यांचाच अनुवाद ह्याचे एक सुरेख उदाहरण आहे. भावानुवादकांना स्वतःस अपरिमित आनंद मिळतोच. मात्र इतरांना तो तेवढा उत्कट वाटत नाही. कारण त्या आनंदाचे मूळ, मूळ गीताच्या लोकप्रिय झालेल्या चालीत असते. भावानुवादात सापडलेला आनंद, मूळ गाणे गाताना होणाऱ्या आनंदाशी तुलनीय राहत नाही.

**शब्दशः अनुवाद**

प्रथमतः अनुवाद हे व्हायलाच हवेत. इतर भाषांतले ज्ञान, शब्दरचनासौंदर्य, नाद, लय, माधुर्य हे आपल्यापर्यंत, आपल्या भाषेपर्यंत पोहोचायलाच हवे, तरच आपल्याला अनोख्या आनंदाचा ठेवा सापडू शकेल. आता त्या अनुवादात मूळ कवितेतील जास्तीत जास्त गुण यायचे तर मग शब्दानुवाद, अर्थानुवाद, भावानुवाद, पद्यानुवाद, गीतानुवाद या क्रमाने ते साधता येऊ शकतात. कमीत कमी गुण आस्वादास मिळावेत म्हणून किमान शब्दानुवाद ही पहिली पायरी समजायला हवी.

(पृष्ठ क्र. १४ वर)

# तमाच्या तळाशी दिवे लागले...

*'तमाच्या तळाशी दिवे लागणं' म्हणजे काय याचा ऊहापोह या लेखात केला आहे. - संपादक*

हे 'तमाच्या तळाशी दिवे लागणं' म्हणजे काय प्रकार आहे? तमाला तळ असतो आणि असला तर लागतो? तमाच्या तळाशी दिवे लागतात/लावता येतात? कसले दिवे? कोण लावतो?

जितेंद्र अभिषेकी बुवांनी गायलेलं शंकर रामाणींचं हे गीत मी असंख्य वेळा ऐकलंय. त्या प्रत्येकवेळी होते तशीच आजही मनाची कातर, व्याकुळ अवस्था झाली. एकाचवेळी गोंधळ, आनंद आणि अस्वस्थता. पण आज थोडा फरक जाणवला मला. दरवेळी डोकं वापरायची सवय लागलेली. प्रश्नांचं मोहोळ उभं राहायचं. उत्तरांचा पत्ता नाही. कुठे शोधणार, कोणाला विचारणार? या सगळ्यात मन सर्द होऊन निपचित पडलेलं असायचं. आज मन थोडं सक्रीय झालेलं. प्रत्येक गोष्ट कळायलाच पाहिजे हा अट्टहास कशासाठी? आणि कळली तरी त्यात अनुभव असेलच असं नाही. प्रचिती शिवाय केलेला प्रयास काय कामाचा! बौद्धिक कसरतींच्या पुढेही काही असतंच ना. असा काही वेळ विचार करत राहिलो. विचार कसला, अंधुकलेली निर्विचार अवस्था. मग भिरभिर थोडी उणावली.

'दिठी' हा शब्द या रचनेतला 'तोलनबिंदू' आहे. दिठी म्हणजे दृष्टी-डोळसपणा. दिठी असली की दिवा लागतोच. हा शब्द आला की मला लगोलग ज्ञानेश्वर आठवतात आणि ज्ञानेश्वरीही आठवते. तेजाळलेली दिठी असलेली व्यक्ती म्हणून ज्ञानेश्वर आणि तिचा सढळ वापर आहे म्हणून ज्ञानेश्वरी. ज्ञानेश्वरांना दिठी हा शब्द फार प्रिय आहे. खूप वेळा आणि खूप वेगळ्या संदर्भात ते दिठी शब्दाची योजना करतात. एके ठिकाणी तुमच्या कृपादृष्टीमुळे प्रसन्नतेचे मळे फुलले आहेत अशा अर्थाने ते दिठी शब्द वापरतात- 'तुमचे या दिठिवेयाचिये वोलें। सासिन्नले प्रसन्नतेचे मळे'. दुसऱ्या ठिकाणी कावीळ झालेल्या दृष्टीला चांदणेसुद्धा पिवळे दिसते अशा अर्थाने दिठी शब्द वापरतात- 'एऱ्हवीं दिठी वेधली कवळें। तैं चांदणियातें म्हणे पिंवळें'. पण दिठी शब्दाचा ज्ञानेश्वरीतील मला आवडलेला अर्थ आहे -'जो ज्ञानियांचा बापु। देखणेयांचे दिठीचा दीपु.' काय देखणा शब्दप्रयोग आहे आणि अर्थाची केवढी घनता आहे! रामाणींच्या रचनेचा अवघा आशय ज्ञानेश्वर 'दिठीचा दीपु' या दोन शब्दांत मांडतात. बघणाऱ्यांच्या दृष्टीचा दिवा लागला की मग अंधाराच्या तळाशी दिवे लागतात. ज्ञानेश्वरांशिवाय असे अंधाराच्या तळाशी दिवे कोण लावणार?

हे असे दिवे लागणं म्हणजे जागं होणं. थोडं लौकिकात येऊन बोलायचं तर; आपल्या क्षमता आपल्याला समजणं, आपलं ध्येय निश्चित होणं आणि कशासाठी जगायचं याची लख्ख समज येणं. पैसा, प्रसिद्धी, पद, मानमरातब हे ध्येय ठेवायचं आणि यांसाठी जगण्याचा अट्टहास करायचा, की दृष्टीच्या दिशा विस्तारत नेत 'सोने रूपे आम्हा मृत्तिकेसमान' असा अनुभव घ्यायचा. जगण्याचा अनुभव घेत घेत भेद-असुया-मोह हे भ्रम आहेत हे कळो यायला लागतं. 'आपल्यासवें इतरांनाही सर्व लाभो' असा मनोविस्तार होतो. यालाच 'जागं' होणं म्हणायचं. हा विवेक दीप उजळला की मग तमाची तमा कशाला?

---

माणसाला दोनच गोष्टी हुशार बनवतात; एक म्हणजे वाचलेली पुस्तके आणि दुसरी, भेटलेली माणसे!

आयुष्याची ओंजळ रीती हवी. मोत्यांनी भरलेल्या ओंजळीत मोगऱ्याची फुलं कशी येणार? हाच मोगरा फुलणं आहे, हेच 'फुले वेचिता बहरू' कळियासी येणं आहे. आयुष्याच्या ओंजळीतून आसक्ती आणि द्वेष टाकला की मग आनंदाची पुष्पवृष्टी ठरलेली आहे. रीती ओंजळ कोणापुढेही पसरायची नाही, पण कोणासाठी ओंजळ रीती करायची हे कळायला हवं. हे 'मोकळं होणं' आहे. बाहेरचे पाश सुटायला हवेत. मग स्वत:ला हुंगता येतं, स्वत:चा गंध घेता येतो. स्वत:ला मोकळं करणं अवघड आहे, पण आवश्यकही आहे. हा असा स्वत:चा गंध घेता आला की रोमारोमांत चैत्र फुलतो. चैत्र नवी पालवी, नवा उन्मेष आणतो. त्याचं फुलणं म्हणजे जगणं असं मस्त डवरून येणं असतं. देहाच्या यात्रेत फार गुंतायचं नाही. यांत अध्यात्म किंवा तात्त्विक शब्दफुलोरा वगैरे काही नाही. जगणं आनंदी होण्यासाठी सुचवलेला हा अतिशय तरल, संवेदनशील पण प्रभावी उपाय आहे. संपणाऱ्या गोष्टींचा मोह किती ठेवायचा आणि हव्या त्या गोष्टी चिरंतन टिकायला पाहिजेत हा हट्ट कशाला करायचा? हे दोन्हीही शक्य नाही- देहच चिरंतन नाही, मग त्याला लपेटून असलेल्या गोष्टींचा तरी भरवसा कशाला धरायचा? हे 'उमजणं' म्हणजे 'तमाच्या तळाशी दिवे लागणं' आहे. हे उमजणं म्हणजे जागं होणं आहे. बहुधा हा या रचनेचा सांगावा असावा. निदान मला तो तसा वाटला.

गोमंतकीय कवी असलेल्या शंकर रामाणींची ही रचना आहे. नंतर ते बेळगाव येथे होते. रामाणी हे मराठी, पोर्तुगीज आणि इंग्रजीतून शिकलेले कवी होते. त्यामुळे बहुश्रुत आणि मोठा आवाका असलेले कवी. त्यांच्या मनाचा पैस असा अतिशय संवेदनशील होत आपल्यावर प्राजक्ताचा सडा शिंपडतो आणि आपण भावविभोर होतो. रामाणींना प्रणाम!

दिवे लागले रे दिवे लागले
तमाच्या तळाशी दिवे लागले
दिठींच्या दिशा खोल तेजाळताना
कुणी जागले रे कुणी जागले

रित्या ओंजळी दाटली पुष्पवृष्टी
असे झाड पैलाड पाऱ्हावले
तिथे मोकळा मी मला हुंगिताना
उरी गंध कल्लोळुनी फाकले

उभ्या रोमरोमांतुनी चैत्रवाटा
कुणी देहयात्रेत या गुंतले
आरक्त त्याच्या कृपेच्या कडा अन्
उषासूक्त ओठांत ओथंबले

**– डॉ. आनंद कुलकर्णी**
इंग्रजी विभाग प्रमुख
ग्रामोन्नती मंडळाचे कला विज्ञान व वाणिज्य
महाविद्यालय, वारुलवाडी, नारायणगाव,
ता. जुन्नर, जि. पुणे- ४१०५०४

•••

## दिशासाठी

**आपले लेखनसहकार्य अपेक्षित आहे. आपल्या अध्ययन-अध्यापन विषयांतील नवीन घडामोडी, नवीन ज्ञानक्षेत्रे यांबाबत सातत्याने लेखन करणे हे अध्यापनात साहाय्यकारी ठरणारे आहे.**

**तरी, आपणाकडून लेखन अपेक्षित करीत आहे.**

**– संपादक**

जर माणसाला गलिच्छ आणि घाणेरडे कपडे घालायची लाज वाटते;
तर गलिच्छ आणि घाणेरड्या विचारांची लाज का वाटू नये?

# मदनलाल धिंग्रा यांचे अपूर्व शौर्य

*मदनलाल धिंग्रा यांनी कर्जन वायली याला एक जुलै १९०९ रोजी गोळ्या घालून ठार केले. मातृभूमीच्या प्रेमासाठी केलेल्या या कृत्याला साहाजिकच फाशीची शिक्षा झाली. मदनलाल धिंग्रा या थोर क्रांतिकारकाविषयी लंडन येथील संकेत कुलकर्णी यांनी लिहिलेला लेख - संपादक*

१ जुलै १९०९. सकाळची पावणेअकरा - अकराची वेळ. लंडनमधल्या इंपिरियल इन्स्टीट्यूटच्या 'नॅशनल इंडीयन असोसिएशन'ची मिटींग होती. सभागृहाचे नाव जहांगीर हॉल. त्या कार्यक्रमाला भरपूर भारतीय विद्यार्थी हजर होते. त्यावेळच्या पद्धतीनुसार कार्यक्रमाचे मुख्य अतिथीही तिथे सपत्नीक आलेले होते.

कार्यक्रम व्यवस्थित पार पडला. मुख्य अतिथींच्या पत्नी क्लोकरूममध्ये ठेवलेले त्यांचे सामान आणायला गेल्या. मुख्य अतिथी आणि त्यांचे एक पारशी डॉक्टर मित्र - जे शांघाईत रहात असत - जिने उतरत होते. तितक्यात तीन गोळ्यांचे आवाज झाले. एक गोळी मुख्य अतिथींचा उजव्या डोळ्यात घुसली होती. त्या पारशी डॉक्टर मित्राने मध्ये येऊन मुख्य अतिथींना वाचवायचा प्रयत्न केला. दुसरी गोळी त्या डॉक्टरच्या छातीतून आरपार झाली. तिसरी गोळी मुख्य अतिथींच्या डाव्या डोळ्याखालून मेंदूत शिरली होती. मुख्य अतिथी जिन्यावर गतप्राण होऊन उताणे पडले. एकूणच हलकल्लोळ उडाला. बाजूला तो पारशी डॉक्टरही रक्ताच्या थारोळ्यात पडला होता. गडबड ऐकून मुख्य अतिथींची पत्नी तेथे आली. जिन्यावर पडलेल्या पतीपाशी जाऊन त्याला उठवायचा प्रयत्न करू लागली.

ह्या गडबडीतच कोणीतरी पोलिसांना बोलावले. पोलिस कॉन्स्टेबल निकोल्स तिथे काही मिनिटांतच पोहोचला. सर लेस्ली चार्ल्स प्रोबीन आणि मेजर जनरल डिकसनही तिथे पोहोचले. पंचविशीचा तो भारतीय तरुण अजूनही हातात रिव्हॉल्वर घेऊन उभा होता. त्याच्या तोंडावर त्याने केलेल्या कृत्याचा जराही पश्चाताप झालेला वाटत नव्हता. निकोल्सने त्याच्या हातून रिव्हॉल्वर काढून घेतले. त्या तरुणाची झडती घेतली. त्यात त्या तरुणाकडे अजून एक लोडेड रिव्हॉल्वर आणि दोन सुरे मिळाले. त्या तरुणाला जेरबंद करून वॉल्टन स्ट्रीटच्या पोलिस स्टेशनात नेण्यात आले. इथे त्या पारशी डॉक्टरला जवळच्या सेंट जॉर्ज हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले, पण तेथे पोहोचताच त्याला मृत घोषित करण्यात आले.

पोलिस चौकशीत कळलं की, हा तरुण लंडनच्या इंपिरियल इन्स्टीट्यूटमध्ये फर्स्ट इयर इंजिनिअरिंगला होता. घरचा भरपूर श्रीमंत. याचा मोठा भाऊ लंडनमधूनच बॅरिस्टर झालेला होता. लहान भाऊही बॅरिस्टरीसाठी लंडनच्या ग्रेज इनमध्ये आलेला होता. त्याचे वडील पंजाबमधले अतिशय सुप्रसिद्ध सर्जन होते. आणि हे सगळं कमी की काय म्हणून - त्या तरुणाकडून मारला गेलेला त्या कार्यक्रमाचा मुख्य अतिथी आणि त्या तरुणाचे वडील ह्यांचे व्यवस्थित मैत्रीचे संबंध होते!

विचार करून पहा - वय वर्ष पंचवीस - लंडनमध्ये राहून इंजिनियरिंगचं शिक्षण - पैशाची काहीच ददात नाही - वडिलांचे ब्रिटिश सरकारशी नीट संबंध - इंजिनिअरिंगनंतर भारतात किंवा लंडनमध्ये राहून खोऱ्याने पैसे ओढता आले असते - तरीही हा माणूस हे कृत्य


आई आणि बायको दोघींची कदर करा. कारण एकीने तुम्हाला या दुनियेत आणलं
आणि दुसरी सारी दुनिया सोडून तुमच्या जवळ आलिय.

करायला का धजावला असेल? कारण एकच – मातृभूमीवरचं प्रेम. पण कशावरून त्याने हे मातृभूमीच्या प्रेमासाठी केलं? तेही सांगतो. पोलिस झडतीत हत्यारांसोबत ह्या तरुणाकडे एक कागद मिळाला – जे एक लिहून आणलेलं डिक्लेरेशन होतं. जे पुढे कोर्टात वाचून दाखवलं गेलं. त्यात म्हटलं होतं की, ...जर जर्मनांनी इंग्लंडवर हल्ला केला आणि समजा लंडनमध्ये जर्मन सैन्य दिसू लागलं – त्या सैन्यावर जर समजा कोणी इंग्रज माणसाने हल्ला केला आणि एकादोघा जर्मनांना ठार मारले तर त्याला तुम्ही देशप्रेमी म्हणाल? हेच कृत्य मी माझ्या मातृभूमीसाठी केलेलं आहे... (सोबत हे संपूर्ण डिक्लेरेशन मी देतोय ते नक्की वाचा!)

कोर्टाला काही दया यायचा संबंध नव्हताच. फाशीची शिक्षा सुनावली गेली. इथे पंजाबात ह्या तरुणाच्या वडिलांनी 'जाहीरनामा' काढला आणि सांगितलं की – ह्या मुलाचे आमच्याशी काही संबंध नाहीत. आम्ही ह्या खूनाच्या कृत्याचा निषेध करतो! – आणि हेही कमी म्हणून की काय – हा जाहीरनामाही त्या फाशीच्या शिक्षेवेळी कोर्टात वाचून दाखवण्यात आला!

१७ ऑगस्ट १९०९ ची सकाळ. लंडनच्या पेंटॉनव्हिले तुरुंगात त्या कैद्याला चहा आणि ब्रेडची न्याहारी देण्यात आली. ती झाल्यावर सकाळी नऊ वाजता फाशी झाली. कैद्याच्या वागण्यात, बोलण्यात कोणतीही भीती नव्हती. अविचल धैर्याने तो फाशी चढला. प्रेत वगैरे परत पाठवायचा प्रश्नच नव्हता कारण कुटुंबीयांनी 'जाहीरनामा' काढलेला होताच. तिथेच पेंटॉनव्हिले तुरुंगाच्या परिसरात, ह्या लहानपणी चांदीच्या झारीने दूध प्यायलेल्या तरुणाचे प्रेत बेवारशासारखे पुरले गेले. अंत्यसंस्कार वगैरे लांबच.

चला, संपली एकदाची गोष्ट. परत वळू या आपल्या रुटीनकडे. १ जुलै काय नेहेमीप्रमाणे दरवर्षी येतोच!


... address, and he gave them as "Dhingra, Ledbury Road." Witness, speaking to him mostly in Hindustani, asked what could be his motive for the crime. He replied, "I will tell the police."

Police-constable Frederick Nicholls, 476 B, said that on being called to the Imperial Institute he found prisoner being held by several gentlemen, and he took him into custody. On his being searched there were found in prisoner's waistcoat pocket the pistol and the dagger produced.

Detective-sergeant Frank Eagles, B Division, who was with Nicholls, spoke to the arrest and the finding upon prisoner of the second revolver and cartridges.

Superintendent Alfred Isaac, B Division. On the early morning of July 2 I saw prisoner at Marylebone Police Station. The charge was read over to him and he nodded his head.

Sub-Divisional Inspector Charles Glass, B Division. At the police station I took the charge against prisoner. On its being read over he said, "Yes," nodding his head. I said, "Do you wish any of your friends to be communicated with?" He replied, "I do not think it necessary to-night, they will know later on."

Inspector Albert Draper, B Division. I was present at Westminster Police Court on July 2. Just before being remanded, prisoner said to the magistrate, "The only thing I want to say is that there was no wilful murder in the case of Dr. Lalcaca; I did not know him; when he advanced to take hold of me I simply fired in self-defence."

Dr. Thomas Neville, 123, Sloane Street. On July 2 I went to the Imperial Institute and there saw the dead body of Sir Curzon Wyllie. Later that night I saw prisoner at the police station; he seemed quite calm, and collected. I asked him whether he was hurt, and he said "No." I felt his pulse; it was quite regular and normal. On making a post-mortem examination of Sir Curzon Wyllie I found a bullet entrance wound on the right eye, with an exit wound at the back of the neck; another two wounds on the left eye and at the back of the neck; two other wounds, one below the left ear, the other over the left eyebrow, the bullets being found in the head. The [illegible] death must have been instantaneous.

This concluded the case for the prosecution.

The Lord Chief Justice (addressing the prisoner). Do you wish to give evidence in the box or say what you have to say there?

Prisoner. I have nothing to say. I admit that I did it. This evidence is all true. I should like my statement read.

The Lord Chief Justice. Do you wish your statement read that you made at the police court?

Prisoner. Yes.

The statement was read, as follows: "I do not want to say anything in defence of myself, but simply to prove the justice of my deed. As for myself, no English law court has got any authority to arrest and detain me in prison, or pass sentence of death on me. That is the reason I did not have any counsel to defend me.

"And I maintain that if it is patriotic in an Englishman to fight against the Germans if they were to occupy this country, it is much more justifiable and patriotic in my case to fight against the English. I hold the English people responsible for the murder of 80 millions of Indian people in the last fifty years, and they are also responsible for taking away £100,000,000 every year from India to this country. I also hold them responsible for the hanging and deportation of my patriotic countrymen, who did just the same as the English people here are advising their countrymen to do. And the Englishman who goes out to India and gets, say, £100 a month, that simply means that he passes a sentence of death on a thousand of my poor countrymen, because these thousand people could easily live on this £100, which the Englishman spends mostly on his frivolities and pleasures. Just as the Germans have no right to occupy this country, so the English people have no right to occupy India, and it is perfectly justifiable on our part to kill the Englishman who is polluting our sacred land. I am surprised at the terrible hypocrisy, the farce, and the mockery of the English people. They pose as the champions of oppressed humanity—the peoples of the Congo and the people of Russia—when there is terrible oppression and horrible atrocities committed in India; for example, the killing of two millions of people every year and the outraging of our women. In case this country is occupied by Germans, and the Englishman, not bearing to see the Germans walking with the insolence of conquerors in the streets of London, goes and kills one or two Germans, and that Englishman is held as a patriot by the people of this country, then certainly I am prepared to work for the emancipation of my Motherland. Whatever else I have to say is in the paper before the Court. I make this statement, not because I wish to plead for mercy or anything of that kind. I wish that English people should sentence me to death, for in that case the vengeance of my countrymen will be all the more keen. I put forward this statement to show the justice of my cause to the outside world, and especially to our sympathisers in America and Germany."

The Lord Chief Justice. Do you wish to call any evidence?

Prisoner. No. I only want the statement to be read.

The Lord Chief Justice. Do you wish to say anything more?

Prisoner. There is another statement on foolscap paper.

The Lord Chief Justice. Any other statement you must make now [illegible]

[illegible]

The Lord Chief Justice. If there is anything you wish [illegible] the Jury say it now. You can say anything you wish.

Prisoner. It was taken from my pocket among other papers.

The Lord Chief Justice. I don't care what was in your pocket. The question of what you have written before has nothing to do with this case. You have got to say anything you wish to the Jury. What [illegible]

© संकेत कुलकर्णी (लंडन)
© संकेत कुलकर्णी (लंडन)

तळटीप: ज्यांना अजूनही तो तरुण कोण हे कळलं नाही त्यांच्यासाठी. तो तरुण म्हणजे मदनलाल धिंग्रा. कार्यक्रमाचा मुख्य अतिथी कर्झन वायली. (ह्याचा लॉर्ड कर्झनशी संबंध नाही!) तो पारशी डॉक्टर डॉ कावसजी लाल्काका.

कर्झन वायलीला रिचमंड स्मशानभूमीत पुरण्यात आले. लंडनच्या सेंट पॉल्स येथे त्याच्या नावाचा एक स्मृतीफलकही आहे. डॉ. कावसजींची कबर ब्रुकवूड स्मशानभूमीत आहे आणि मदनलाल धिंग्रा? १९७४ साली पेंटोनव्हिले तुरुंगात उधमसिंगांचे अवशेष शोधताना अचानक मदनलाल धिंग्रांचे अवशेष मिळाले. ते भारतात त्यांच्या परिवाराकडे पाठवण्यात आले. पण त्यांनी ते स्वीकारण्यास तेव्हाही नकार दिला. आज महाराष्ट्रातल्या अकोल्यातल्या एका चौकाला मदनलाल धिंग्रांचे नाव देऊन त्यामध्ये धिंग्रांचे काही अवशेष ठेवलेले आहेत!

**– संकेत कुलकर्णी**
लंडन

●●●

# वकिली व्यवसाय : काल, आज आणि सर्वांचे काय?

*वकिली व्यवसायात काळानुरुप झालेल्या बदलांचा आढावा या लेखात घेण्यात आला आहे. - संपादक*

भारतामध्ये 'कायदा' हा फार प्राचीन विषय असला तरी वकिली व्यवसाय मात्र ब्रिटिशांच्या आगमनानंतर कायदेशीररित्या अस्तित्त्वात आल्याचा दिसतो. भारतामध्ये न्यायदानाचे काम हे राजाचे असल्यामुळे तक्रारदारांनी स्वतःची कैफियत मांडणे आणि त्याला आरोपित व्यक्तीने प्रत्युत्तर देणे याची अनेक उदाहरणे आपणास माहितीच असतील. मोघल साम्राज्यात वकील नेमण्याची पद्धत जरी अस्तित्वात होती तरी, वकील होण्यासाठी विशेष अशा कौशल्याची किंवा शिक्षणाची अट नव्हती. वकील हा एक फारसी शब्द आहे जो आज सर्वमान्य शब्द बनला आहे. ब्रिटिशांच्या आगमनानंतर, १७२६ मध्ये मद्रास आणि नंतर बॉम्बे, कलकत्ता इथे मेयर कोर्टाची स्थापना झाल्यानंतर वकिली व्यवसायाची सुरुवात झाल्याचे दिसते. याच्यापूर्वी जरी इतर न्यायालयांची स्थापना झाली असली तरी वकिली व्यवसाय तिथे स्थापित झालेला किंवा सुरू झालेला दिसत नव्हता. १७७४ मध्ये कलकत्ता, १८०१ मध्ये मद्रास आणि १८२३ मध्ये बॉम्बे इथे सुप्रीम कोर्टाची स्थापना झाल्यानंतर वकिली व्यवसायाकडे अनेकांचे लक्ष केंद्रित झाल्याचे दिसते. १७७४ च्या कायद्याने सुप्रीम कोर्टास वकिली व्यवसाय करण्याचा परवाना देण्याचा अधिकार दिला. त्यामुळे इंग्लंड मधून बॅरिस्टर पदवीधारक वकिली व्यवसाय करू लागले. मद्रासचे श्री. बेंजामिन सुलीण यांना १७७८ मध्ये बॅरिस्टर होण्याचा पहिला मान मिळाला. यानंतर १९७९ मध्ये लिगल प्रॅक्टिशनर कायदा, १९२३ मध्ये इंडियन बार कमिटी, १९२६ मध्ये इंडियन बार कौन्सिल कायदा ते स्वतंत्र भारतातील भारतीय अधिवक्ता अधिनियम, १९६१ या सर्वांनी भारतातील वकिली शिक्षण आणि वकिली व्यवसाय यास नियमबंध केल्याचे दिसून येते. स्वातंत्र्य संग्रामातील सर्वच विचारांचे नेते हे मुख्यतः बॅरिस्टर होते याची आपणास जाणीव आहेच. हा सगळा इतिहास उजळविण्याचे कारण एवढेच की, आज वकिली व्यवसाय कुठे उभा आहे याचे योग्य दर्शन व्हावे.

आज भारतीय अधिवक्ता मंडळ, राज्य अधिवक्ता मंडळ, विद्यापीठ अनुदान आयोग आणि संबंधित विद्यापीठे यांच्या माध्यमातून वकील शिक्षण नियमबंध केले जाते, राज्य अधिवक्ता मंडळ हे विधी पदवी असलेल्या योग्य उमेदवारास वकिली करण्याचा परवाना देते. वैद्यकीय शिक्षणापेक्षा वकिली शिक्षण तुलनेने फार सोपे असले तरी वकिली व्यवसाय मात्र फार अवघड व जिकरीचा व्यवसाय आहे. वैद्यकीय शिक्षण पूर्ण केल्यानंतर खात्रीपूर्वक जशी नोकरी किंवा स्वतःचा वैद्यकीय व्यवसाय सुरू करता येतो, तसे वकिली व्यवसायात करता येत नाही. एकेकाळी खूप थोर मानल्या जाणाऱ्या वकिली व्यवसायाची आजची स्थिती काय आहे हे जाणणे फार आवश्यक आहे.

भारतामध्ये आजच्या घडीला २० लाखांपेक्षा अधिक वकील किंवा अधिवक्ता आहेत. प्रत्येक वर्षी जवळपास २० हजार लोक वकिली व्यवसायात येतात. त्यातील किती वकील हा व्यवसाय पुढे कायम ठेवत असतील हा वेगळा विषय आहे. भारतामधील लिगल इंडस्ट्री ही फार नावारूपाला येत आहे. या क्षेत्रामध्ये

आज करोडो रुपयांची कमाई होत असल्यामुळे अनेक विदेशी लिगल फर्म भारतामध्ये वकिली करण्यास उत्सुक आहेत. मार्च २०१८ मध्ये भारतीय लिगल इंडस्ट्रीची वार्षिक उलाढाल ही जवळपास ८४०० करोड एवढी होती. यामध्ये सगळ्याच प्रकारच्या कायदेशीर कामाचा समावेश होता. २०२० च्या राष्ट्रीय टाळेबंदीमध्ये यात मोठी तफावत आली असली तरी टाळेबंदी नंतर हळूहळू ती पूर्वपदावर येत आहे. खरा मुद्दा हा आहे की, २०-२१ लाख वकिलाची ही वार्षिक कमाई आहे की फक्त काही मोजक्या वकिलांची? आणि लिगल फर्मची? अहवाल असे सांगतो की, वकिली व्यवसायातून येणारी मोठी कमाई ही मोठमोठ्या लिगल फर्मच्या आणि मोठमोठ्या वकिलांच्या खिशातच जाते. लिगल इंडस्ट्री आज नव्या रूपामध्ये आकार घेत आहे. पारंपरिक वकिलीच्या बाहेर जाऊन कायदा हे क्षेत्र उद्योग आणि रोजगाराच्या अनेक संधी निर्माण करत आहे. (LPO) एलपीओ हा एक त्यातला यशस्वी प्रयोग आहे. हा प्रयोग कमालीचा यशस्वी ठरला आहे. LPO म्हणजे लिगल प्रोसेस आऊटसोर्सिंग, यामध्ये कायद्यावरील शोध, दस्तऐवज बनविणे, मसुदे तयार करणे, त्याचा अभ्यास करणे, कायदेशीर सल्ले देणे असे अनेक प्रकारचे काम असते. यामध्ये न्यायालयात न जाता कायद्याशी संबंधित कामे करावी लागतात. LPO यामध्येही मोठ्या प्रमाणात पैसे मिळतात. आज भारतामध्ये १०० हून अधिक LPO कार्यरत आहेत. विदेशी पक्षकारासाठी भारतामध्ये राहून कायदेशीर सेवा देणे देखील एलपीओच्या कामाचे स्वरूप आहे. एका अनुमानानुसार कायद्याच्या या नव्या व्यवसायात वार्षिक ४०% आर्थिक वाढ संभव आहे. वकिली किंवा कायदेशीर व्यवसायाची ही एक प्रकाशित आणि आशादायी बाजू बघितल्यानंतर या व्यवसायाची दुसरी, थोडीशी अंधारलेली बाजू बघणे देखील आवश्यक आहे. वकिली व्यवसाय करण्यासाठी विशेष असे भांडवल लागत नाही ही या व्यवसायाची जमेची बाजू आहे. दुसरे म्हणजे, विधीची पदवी मिळविणे तुलनेने सोपे असल्यामुळे देखील अनेक विद्यार्थी या शिक्षणाकडे आणि व्यवसायाकडे आकर्षित होतात. परंतु दुसऱ्या बाजूचे चित्र आल्हादायक नाही. घरामध्ये वकिली व्यवसाय जर पहिल्यांदाच कुणी सुरू करणार असेल तर त्यांच्यासाठी अगोदरची काही वर्षे फार तणावाची असतात (यास अपवाद असलेले अनेक असतीलही) भारतातील मोठ्या शहरामध्ये देखील ७९% जुनिअर वकील हे महिन्याचे १० हजार रुपये देखील कमावू शकत नाहीत ही आजची परिस्थिती आहे. वरिष्ठ वकिलांनी त्यांच्याकडे असलेल्या शिकावू वकिलाला मासिक एखादी ठरावीक रक्कम दिलीच पाहिजे असा काही नियम नाही. फार थोडे वकील त्यांच्याकडे असलेल्या शिकावू वकिलास थोडीफार आर्थिक मदत करीत असतात. अशावेळी वकिली व्यवसायात प्रवेश करूनही काहीही आर्थिक कमाई न करू शकणारे अनेक वकील हा व्यवसाय सोडतात. लहान तालुक्यातील आणि जिल्ह्यातील न्यायालयात वकिली करणे तर अजूनही अवघड. राष्ट्रीय टाळेबंदी मध्ये अनेक वकिलांची आर्थिक आणि मानसिक स्थिती एवढी ढासळली होती की, काहींनी आत्महत्या केली आणि काहींनी दुसरा कामधंदा शोधला. २०२० नंतर अनेक राज्यांनी जुनिअर वकिलासाठी काही आर्थिक मदतीचा नियम पारित केला. रुपये ३ हजार ते ५ हजार एवढी मदत वेगवेगळी राज्ये त्यांच्या राज्यातील अधिवक्ता मंडळात नोंद झालेल्या वकिलास केली जाते. भारतामध्ये जवळपास १४०० विधी महाविद्यालये आहेत. भारतातील मोठमोठ्या लिगल फर्म काही मोजक्याच महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना पसंती देतात, हा इतर महाविद्यालयाच्या हुशार व होतकरू विद्यार्थ्यांवर अन्याय आहे हे काही कुणापासून लपलेले नाही.


भारतातील कायद्या व न्यायिक संस्थांमध्ये

महिलांचा सहभाग या चर्चेचा मुख्य बिंदू असला पाहिजे. भारतीय कायदेशीर व्यवसाय हा प्रामुख्याने पुरुषप्रधान आहे. एकूण संख्येवर संक्षिप्त नजर टाकल्यास असे दिसून येते की, या क्षेत्रात महिलांची संख्या खूपच कमी आहे. २०१२ पर्यंत, भारताच्या सर्वोच्च न्यायालयात वरिष्ठ वकिलाच्या पदावर बढती मिळालेल्या २९४ वकिलांपैकी फक्त पाच महिला होत्या. त्याचप्रमाणे सर्वोच्च न्यायालयाच्या ७२ वर्षांच्या इतिहासात केवळ अकरा महिला न्यायाधीश झालेल्या आहेत. अर्थात वकिली क्षेत्रात महिलांची संख्या वाढत असली तरी, महानगरांमधील काही मोजक्या महिला वकिली व्यवसाय व्यवस्थित करू शकतात हे चित्र आहे.

भारतीय अधिवक्ता मंडळाला, विद्यापीठे व विधी महाविद्यालये यांना सोबत घेऊन हा व्यवसाय करू पाहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी काही योजना तयार करणे आवश्यक आहे. विधीची पदवी घेणाऱ्या व कायदा क्षेत्रात करिअर करू इच्छिणाऱ्यांना विद्यार्थ्यांना या क्षेत्रामध्ये संधी मिळेल व स्पष्टपणे जाणवणारा भेदभाव नष्ट होईल हा प्रयत्न करावा लागेल.

**– प्रा. विनोद एच वाघ**
सहाय्यक प्राध्यापक
विद्या प्रसारक मंडळाचे टिएमसी विधी
महाविद्यालय, ठाणे

•••



(पृष्ठ क्र. ७ वरून – **पद्यानुवादांचा रसास्वाद**)

**समारोप –** पद्यानुवादाप्रती वाचकाचा दृष्टीकोन कसा असावा? तर तो बंद शिंपल्याकडे पाहण्याचा असावा. कुठल्या शिंपल्यात पाणीदार मोती सापडेल ते आपल्याला काय माहीत. जमतील तेवढी बंद शिंपली पदरात बांधून घ्यावी हाच दृष्टीकोन श्रेयस्कर ठरेल. म्हणून मला असे वाटते की, पद्यानुवादकांना आपण प्रोत्साहन द्यायला हवे. पद्यानुवाद ही सहजसाध्य कला नाही. परिश्रमानेही त्वरित साधते अशीही कला नाही. म्हणून, मूळ भाषेतील रचनेतील, मूळच्या आवडी-निवडीला, अभ्यासपूर्ण आकलन आणि कुशाग्र अभिव्यक्तीद्वारे अधिक आस्वाद्य करून, आपणांस सहर्ष सादर करणाऱ्या कलाकारांची आपण योग्य ती कदर करायला हवी. त्यांच्याकडून आपणास अनुपमेय कलाकृती, कायमच, आस्वादास मिळाव्यात अशी अपेक्षा करायला हवी. आपणही या दुर्मीळ कलेला प्रोत्साहन देऊन, उमेदवार मिळवून द्यायला हवेत. म्हणजे अन्य भाषांतील आविष्कारांच्या आस्वादाची, स्वभाषेत सोय उपलब्ध होऊ शकेल!


मनोगतावर अलीकडेच अनेकांना पद्यानुवादात रुची निर्माण होत आहे. मनोगताच्या प्रशासकांची पद्यानुवादांकडे पाहण्याची दृष्टी आणि त्यावर त्यांनी दाखवलेला विश्वासच ह्यासाठी कारणीभूत आहे. अनेकदा राजाश्रयाने साधता येतात त्या गोष्टी लोकाश्रयानेही साध्य होऊ शकत नाहीत. इथल्या राजाश्रयाद्वारे, पद्यानुवादांस भरभराटीचे दिवस येवोत हीच प्रार्थना. पद्यानुवादास प्रवृत्त होणाऱ्या नवोदितांसही सहर्ष आमंत्रण आणि शुभेच्छा!

**– नरेंद्र गोळे**
१०४ दत्तात्रय प्रसन्न, जोशीवाडी,
टिळकपथ टिळकनगर, डोंबिवली (पू.) ४२१२०१
भ्रमणध्वनी : ९९३०५०१३३५
Email : narendra.v.gole@gmail.com

•••

# असत्यमेव जयते?
## एक पुस्तक परीक्षण

*असत्यमेव जयते? - या अभिजित जोग लिखित पुस्तकाचा परिचय या लेखात केला आहे.- संपादक*




अभिजित जोग Abhijit Joag ह्यांचे 'असत्यमेव जयते?' ह्या नाट्यमय शीर्षकाचे भारताच्या इतिहासाची खरी ओळख करून देणारे पुस्तक दोन दिवसांपूर्वी विकत घेतले आणि झपाटल्यासारखे वाचून संपवले सुद्धा. इतिहासाच्या नावाखाली आपल्याला इतकी वर्षे किती खोट्या गोष्टी सांगितल्या गेल्या आहेत ह्याचा तर्कशुद्ध, पुराव्यानिशी घेतलेला धांडोळा म्हणजे हे पुस्तक.

पुस्तकाच्या मुखपृष्ठापासूनच पुस्तकाचे वेगळेपण नजरेत भरते. मेंदू भगवा आहे, पण डोळ्यांवर बांधलेल्या खोट्या शांतीच्या आणि धर्मनिरपेक्षतेच्या भ्रामक पांढऱ्या पट्टीमुळे सामान्य भारतीय नागरिकाला सत्य दिसतच नाही, त्याला फक्त ऐकू येते ते ओठांवाटे निघालेले हिरवे असत्य आणि कांगावखोरपणे काढलेला गळा!

पाश्चात्त्य इतिहासकारांनी आपल्या गळी बळीच उतरवलेले सर्वात मोठे असत्य म्हणजे तथाकथित #AIT किंवा आर्यन इन्वेजन थीयरी. भारताच्या पश्चिमेकडून आलेल्या गोऱ्या वर्णाच्या आर्य लोकांनी भारतावर आक्रमण करून इथली मूळ सिंधू संस्कृती नष्ट केली, त्यांची नगरे उद्ध्वस्त केली आणि तिथल्या मूलनिवासी सावळ्या वर्णाच्या लोकांना दक्षिणेकडे रेटले ही धादांत खोटी कपोलकल्पना मुळात ब्रिटिश राज्यकर्त्यांच्या सुपीक डोक्यातून आलेली. स्वतःच्या जुलमी वर्णवर्चस्वी वसाहतवादाला पुष्टी देण्यासाठी आणि भारतीयांना आपल्या मुळांपासून दूर नेण्यासाठी म्हणून म्हणून ब्रिटिश इतिहासकारांनी आर्यन आक्रमणाचा हा सिद्धांत मांडला, आणि भारतीय वंशाच्या मार्क्सवादी इतिहासकारांनी हे धडधडीत असत्य भारतीयांच्या अनेक पिढ्यांच्या गळी उतरवले.

पुरातत्वीय, भौगोलिक, जीवशास्त्रीय आणि साहित्यिक अशा सर्वच पुराव्यांनी ह्या सिद्धांताचा खोटेपणा जगापुढे उघड केला तेव्हा ह्याच इतिहासकारांनी आक्रमण शब्द वापरणे सोडून 'आर्यन मायग्रेशन थियरी' ह्या नावाने आर्य नावाचा परकीय वंश बाहेरून आला आणि त्याने आपली संस्कृती भारतातल्या मूळनिवासी लोकांवर लादली हाच सिद्धांत वेगळ्या वेष्टनात विकायला सुरवात केली. अभिजित जोग ह्यांनी आपल्या पुस्तकाच्या पहिल्याच प्रकरणात ह्या खोटारडेपणाचा पूर्णतया पर्दाफाश केला आहे, तोही निकोलस कझानास, डेव्हिड फ्रोली, स्वामी विवेकानंद, श्रीकांत तलागेरी, एन एस राजाराम आणि पीटर अंडरहिल ह्यांसारख्या दिग्गजांच्या शब्दांचा आधार घेऊन, चोख पुरावे देऊन आणि मॅक्सम्युलर सारख्या लोकांचा खोटेपणा त्यांच्याच शब्दात त्यांच्या पदरात घालून!

दुसरे प्रकरण आहे ते जुलमी आणि धर्मांध इस्लामी

आक्रमकांनी भारतावर केलेल्या आक्रमणांबद्दल. भारतीय मार्क्सिस्ट इतिहासकारांनी इस्लामी राजवटीचे उदात्तीकरण तर केलेच, पण त्यांनी हिंदूंवर केलेल्या अन्यायाचे, हिंदू नरमेधाचे, मंदिर विध्वंसाची खोटी कारणे देऊन अप्रत्यक्ष समर्थनच कसे केले आहे ते ह्या प्रकरणात विस्तृतपणे आणि अनेक उदाहरणे देऊन मांडले आहे.

जेव्हा आपण म्हणतो की भारत १९४७ मध्ये स्वतंत्र झाला तेव्हा आपण सहसा ब्रिटिश राजवटीचाच विचार करत असतो, पण भारताच्या पारतंत्र्याचा इतिहास हा फक्त ब्रिटिश काळापुरता मर्यादित नाही. आठव्या शतकात महंमद बिन कासीम ह्याने भारतावर पहिले इस्लामी आक्रमण केले, आपल्या दुर्दैवाला तिथून सुरवात झाली आणि आपला स्वातंत्र्यलढाही तेव्हाच सुरू झाला. आपला वैभवसंपन्न देश परदेशी आक्रमकांना बाराशे वर्षे तोंड देत होता. लढाऊ वृत्ती न सोडता सतत संघर्ष करीत होता. म्हणूनच आठवे शतक ते बारावे शतक ही चारशे वर्षे इस्लामी आक्रमकांना आपली सत्ता एकहाती भारतात स्थापन करता आली नाही. १२ व्या १३ व्या शतकापासून दिल्लीत इस्लामी सत्ता आली खरी पण जंग जंग पछाडूनही इस्लामी आक्रमकांना पूर्ण भारताचे इस्लामीकरण करता आले नाही. इथल्या हिंदू राजांकडून त्यांना सतत प्रतिकार होत राहिला.

दुर्दैवाने भारत स्वतंत्र झाल्यानंतर ज्या लोकांच्या हाती सत्ता गेली त्यांनी ह्या प्रतिकाराच्या उज्ज्वल गाथा आपल्यापुढे कधी मांडल्याच नाहीत. त्यांनी आपल्याला सांगितल्या फक्त आपल्या पराभवाच्या लाजिरवाण्या कथा, त्यादेखील त्यातले आक्रमकांचे क्रौर्य वगळून. महमूद गझनीने जेव्हा भारतावर स्वारी केली आणि सोमनाथ सहित अनेक मंदिरे उद्ध्वस्त केली, लुटली, हजारो हिंदूंची कत्तल केली, हिंदू बायका-मुलांना गुलाम बनवून अफगाणिस्तानला नेले तेव्हा त्याचाच दरबारी इतिहासकार अल बेरूनी ह्याने लिहून ठेवले आहे की,- Mahmud ended the prosperity of India and so cruelly exploited and penalized the people that the Hindus became disgruntled like the dust particles. Hinduism became a matter of history. पण नेहरूंच्या लाडक्या दरबारी इतिहासकार रोमिला थापर बाईंनी आम्हाला इतिहासाच्या पुस्तकात सांगितले की, गझनीच्या मुहम्मदाने फक्त धन लुटायचे म्हणून सोमनाथच्या मंदिराचा विध्वंस केला, हिंदूंना दुखवायचा त्याचा हेतू नव्हता. म्हणजे प्रत्यक्ष सोमनाथच्या मंदिराचा विध्वंस बघून त्याबद्दल लिहिणारा अल-बेरुनी खोटा आणि इतिहासाच्या नावाखाली दंतकथा लिहिणाऱ्या थापरबाई खऱ्या!

दुर्दैवाने, हा भारताचे स्वत्व खच्ची करणारा खोटा, एकांगी इतिहास आपण कित्येक पिढ्या घोकत राहिलो आणि स्वतःला पराभूत मानत राहिलो. मुहम्मद घोरीची भारतावरची स्वारी आपण शाळेत शिकलो पण त्याच्याशी लढून त्याचा पराभव करणाऱ्या गोव्याच्या कदंब राजकन्येची, आणि सोळंकी राणीचे म्हणजेच नायकीदेवीचे नाव मी गोव्याची असून मी पदवीधर होईपर्यंत ऐकले नव्हते. आजही काश्मीर पासून कन्याकुमारीपर्यंतच्या सर्व भारतीय शालेय विद्यार्थ्यांना बाबरचा मुलगा हुमायून, हुमायूनचा मुलगा अकबर, अकबराचा मुलगा जहांगीर, मग शाहजहान, मग औरंगझेब ही वंशावळी माहीत असते; पण आपले आरमार साऊथ ईस्ट आशियात नेऊन हिंदू धर्म कंबोडिया, व्हिएतनाम, श्रीलंकेपर्यंत नेणाऱ्या राज-राजा आणि राजेंद्र चोळ ह्या पिता-पुत्रांची नावे किती लोकांना माहिती आहेत? औरंगझेबाच्या सैन्याचा पराभव करून त्याच्या सैनिकांची नाके कापून त्यांना परत पाठवणारी चिमुकल्या गढवाल राज्याची रणरागिणी राणी कर्णावती हिचे नाव किती जणांनी ऐकलेय? हा सर्व इतिहास जोगांनी ह्या प्रकरणात अतिशय विस्ताराने आणि तर्कशुद्धपणे मांडलाय.

तिसरे प्रकरण आहे ते अनुक्रमे अशोक आणि

कष्ट ही एक अशी चावी आहे; जे नशीबात नसलेल्या गोष्टींचे सुद्धा दरवाजे उघडते.

अकबर ह्यांच्या ऐतिहासिक सत्याचा विपर्यास करून केलेल्या नाहक उदात्तीकरणाबद्दल आणि चौथे प्रकरण आहे ते तथाकथित 'सुफी संतांचा' खरा रक्तरंजित इतिहास आपल्यापासून कसा दडविला गेला आणि त्यांच्या शांतीमय जीवनाचे खोटेच गोडवे भारतीय जनतेपुढे कसे केले गेले ह्याबद्दल.

पाचवे आणि सहावे प्रकरण आहे ते आधुनिक इतिहासाबद्दल. ब्रिटिशांनी भारताचे योजनाबद्ध शोषण करून एकेकाळच्या वैभवसंपन्न आणि समृद्ध देशाला गरिबी आणि दुष्काळ कसा आंदण दिला, आपल्या आर्थिक आणि सांस्कृतिक मागासलेपणाची खरी कारणे आणि अतिशय सुसूत्रपणे भारतीयांमध्ये मुद्दाम रुजवण्यात आलेला आपल्या देशाबद्दलचा, धर्माबद्दलचा, संस्कृतीबद्दलचा न्यूनगंड ह्यावर पाचवे प्रकरण भाष्य करते, तर सहावे प्रकरण 'देदी हमें आझादी बिना खडग बिना ढाल' हे धादांत असत्य देशासाठी प्राणांची बाजी लावणाऱ्या, आपल्या रक्ताने आणि शौर्याने भारतीय स्वातंत्र्याची किंमत मोजणाऱ्या खऱ्या स्वातंत्र्यसैनिकांवर अन्याय कसा करते ह्याचे विस्तृत विवेचन करणारे आहे.

शेवटचे प्रकरण आहे ते लेखकाचे मनोगत आणि ह्या पुस्तकाचा आत्मा. आपला खरा इतिहास जाणून घेणे प्रत्येक भारतीयांसाठी कशाला गरजेचे आहे ह्यावर लेखकाने केलेले चिंतन. इतिहास म्हणजे कहाणी, आपल्या समाजाची, पूर्वजांची, देशाची कहाणी. आपल्या स्वाभिमानाची नाळ जोडलेली असते इतिहासाशी. जेव्हा खोटा धादांत इतिहास आपल्याला सतत ओरडून हेच सांगत असतो की, ग्रीकांशी संबंध येण्यापूर्वी आपण सुसंस्कृत नव्हतो, मुसलमानी आक्रमणे होण्यापूर्वी आपण समर्थ नव्हतो आणि ब्रिटिश राज येण्यापूर्वी आपण एकच राष्ट्र नव्हतो, तेव्हा कुठेतरी एक देश म्हणून आपलं मानसिक खच्चीकरण होत असतं, आणि न्यूनगंडाने ग्रासलेला समाज किंवा देश जगात स्वतःची ओळख निर्माण करू शकत नाही. एक समर्थ, आत्मविश्वास असलेला, प्रगत, शक्तिशाली देश म्हणून जर भारताला स्वतःचे अस्तित्व टिकवायचे असेल तर आपल्या खऱ्या, उज्ज्वल इतिहासाचे ज्ञान आपल्याला असणे आवश्यक आहे, आणि नेमके हेच मोलाचे काम हे पुस्तक थोडक्यात पण फार समर्पकपणे करते. लेखकाची शैली रोखठोक आहे, पुस्तक लिहिताना केलेला अभ्यास पानोपानी जाणवतो. पुस्तकाची संदर्भसूची मोठी आहे.

भीष्म प्रकाशन व भीष्म स्कूल ऑफ इंडिक स्टडीजच्या विविध पुस्तकांची, अभ्यासक्रमांची, उपक्रमांची माहिती आपल्यापर्यंत मिळवत रहा. त्यासाठी...
९५०३८६४४०१ (भीष्म प्रकाशन) व
७८७५१९१२७०(भीष्म स्कूल ऑफ इंडिक स्टडीज)
हे व्हॉटसअप क्रमांक तुमच्या मोबाईलमध्ये सेव्ह करा त्यांवर "Join Bhishma" असा व्हॉटसअप संदेश पाठवा.

भीष्म प्रकाशन, पुणे
9503864401
fb.me/bhishmaprakashan
t.me/bhishmaprakashan
bhishmaprakashan@gmail.com
www.bhishmaprakashan.com

भीष्म स्कूल ऑफ इंडिक स्टडीज
7875191270
fb.me/bhishmaindics
t.me/bhishmaindics
namaste@bhishmaindics.org
www.bhishmaindics.org

भारताच्या राजकीय स्वातंत्र्याला नुकतीच ७५ वर्षे पूर्ण झाली, पण भारतीयांच्या मानसिक स्वातंत्र्यासाठी अशी पुस्तके अत्यंत उपयुक्त आहेत. श्री क्षितिज पाटुकले ह्यांच्या भीष्म प्रकाशनाने प्रकाशित केलेले हे पुस्तक मुद्दाम विकत घेऊन संग्रही ठेवावे आणि इतरांना आवर्जून भेट द्यावे असेच आहे. पुस्तक मागविण्यासाठीची माहिती दुसऱ्या फोटोत दिलेली आहे. हे पुस्तक लिहून अभिजित जोग ह्यांनी खूप मोठे काम केलेले आहे, त्याबद्दल त्यांचे अभिनंदन.


**– शेफाली वैद्य**
पुणे

●●●

# कांतारा - या मातीतला सुंदर चित्रपट

*एखाद्या चित्रपटाचा ट्रेलर पाहून उत्तम मत व्हावे आणि नंतर निराशा व्हावी असे अनेकदा घडते. याउलट मात्र क्वचितच घडते. कांतारा (गूढ जंगल) या मूळच्या कन्नड चित्रपटाबाबत तसे घडले. एकच शब्द,- 'नक्की पहा' - संपादक*

'कांतारा' या चित्रपटाने कर्नाटकात शब्दश: केवढा धुमाकूळ घातला आहे याची आपल्याला कल्पना नसते. यापूर्वी चित्रपट पाहून थरार निर्माण झाल्याचे केव्हा झाले होते? आश्चर्य वाटेल, परंतु तो चित्रपट मराठी होता. राही बर्वे यांचा 'तुंबाड'. दुर्दैवाने तो तुंबाड शहरापुरता मर्यादित राहिला. कांताराने कर्नाटकभर धुमाकूळ घातला आहे. चित्रपटाच्या कथानकाचा गाभा सामान्य माणसाला इतक्या प्रभावीपणे हात घालतो की, आयुष्यभरात चित्रपटगृहात न गेलेले ग्रामीण भागातील लोकदेखील तो आवर्जून पहात आहेत. चित्रपटाचा लेखक-नायक-दिग्दर्शक ऋषभ शेट्टी काही चित्रपटगृहांमध्ये गेला असता वयस्कर लोक आपली पादत्राणे काढून त्याला साष्टांग नमस्कार करू लागले. ते पाहून त्याने जेथे हा चित्रपट दाखवला जात आहे तेथे भेट न देण्याचे ठरवले.




कानडी चित्रपटांच्या दर्जाबद्दल माझे मत फारसे चांगले नाही. असे म्हटले तरी नाग बंधू गिरीश कार्नाड म्हणा किंवा कासारवल्ली; यांचे काही चित्रपट मी आवर्जून पाहिले आहेत. त्यात कथानकावर अधिक भर असे. अगदी दिग्दर्शनासह इतर निर्मितीमूल्ये फारशी प्रभावित करत नसत. सफाईदारपणा दिसत नसे. थोडीफार मराठीसारखीच अवस्था आहे, असे म्हणता येईल. कांतारा पाहिल्यावर हे सारे पूर्वग्रह दूर होतात.

मी चित्रपटाच्या कथानकात फारसे जात नाही. कारण अनेकांचा तो पहायचा राहिला असेल. सुंदर सुरुवात, संथ मध्य आणि अतिसुंदर अखेर अशा स्वरूपाचा हा चित्रपट आहे. चित्रपटाची आताची अडीच-तासांची लांबी अर्ध्या-एक तासाने नक्कीच कमी करता आली असती. चित्रपटात विनोदाची पखरण आहे असे सांगितले जाते. मात्र ती बव्हंशी ग्रामीण कन्नड प्रेक्षकांना आवडेल अशीच आहे. पण ते सोडले तर लोककथा किती प्रभावी पद्धतीने सादर करता येते हे कळते. एरवी अतिशय दुर्लक्षित असलेल्या वराहावताराशी संबंधित केवढ्या खुणा कर्नाटकात आजही शिल्लक आहेत याची आपल्याला कल्पना नसते.

'या चित्रपटात दक्षिण कन्नड भागात प्रचलित लोककथेचा अतिशय उत्तम वापर केला आहे', असे म्हटले तरी चित्रपटाच्या कथेची जन्मकथा अतिशय मनोरंजक आहे. एका चुलत मित्राच्या वाढदिवसाच्या पार्टीत झालेल्या चर्चेत कथेचे बीज पेरले गेले, तरी त्यानंतर झालेल्या चर्चांमध्ये कथेचा शेंडाबुडखा काहीच ठरत नव्हते. मग त्याला लेखकाची स्वत:ची शेतजमीन जेथे आहे, तेथील एका घटनेची जोड मिळाली आणि आणखी थोडा विचार केल्यानंतर तेथील लोककथेची जोड देण्याचे ठरले. अन्यथा ''दोन गटांमधील वैमनस्य' या परिचयाच्या कथानकापेक्षा चित्रपटात वेगळे असे काय आहे'', असे लेखक म्हणून ऋषभ स्वत:च विचारतो म्हणूनच असेल कदाचित; म्हटले तसे चित्रपटाचा प्रारंभ आणि अखेर या व्यतिरिक्त नेहमीच्याच मात्र सफाईदार मसाल्यामुळे चित्रपटाचा मधला काळ तरून जातो.

---

आयुष्यात कुठल्याही परीस्थितीत सुखी राहण्याचा प्रयत्न करा, दुःखी राहिल्याने उद्याचे प्रॉब्लेम सुटणार नाहीयेत उलट आजचे सुख सुद्धा निघून जाईल.

खाली चित्रपटाशी संबंधित व्हिडियोच्या दोन लिंक दिल्या आहेत. एक आहे अनुपमा चोप्रा यांनी घेतलेल्या ऋषभच्या दीर्घ; परंतु अतिशय उत्तम मुलाखतीची. मुलाखतकाराने केलेली पूर्वतयारी यात अगदी ठळकपणे दिसते. दुसरा व्हिडियो आहे तो भारत व्हर्स या युट्युब चॅनलवरील सौरभ ओझा यांचा. चोला राजा हिंदू नव्हते असे म्हणणारी विषारी पिलावळ आणखी एका चित्रपटाच्या निमित्ताने आपण नुकतीच पाहिली. त्याच प्रकारे, 'आदिवासी हे हिंदू नव्हेतच' असे म्हणणारे विषारी साप आजूबाजूला दिसतात. ओझा हे या मानसिकतेवर हल्ला करतात. पूर्वीपासून उत्तम संगीताच्या आधारावर भारतीय चित्रपट रसिकांची फार मोठी फसवणूक केली गेली आहे. तमाशापटापलीकडे म्हणा किंवा अगदी ओळखीच्या नायक-नायिका-खलनायक-नायकाच्या-नायकाच्या बहिणीवर अत्याचार अशा छापाच्या चित्रपटांनी रसिकांची आवड शब्दश: नासवली आहे. यात दिग्गज म्हणवली जाणारी अनेक नावे आहेत. पूर्वी जेवढे तुरळक अपवाद असत, तेवढेच आताही आहेत. त्यातूनच मग 'आजची खानावळ' म्हटले तरी या सुमारीकरणामध्ये केवळ जन्माने हिंदू असलेलेही आहेत हे आपण विसरत असतो. 'कीर्तन ऐकून समाज सुधारत नाही, की लावणी पाहून बिघडत नाही', असे म्हणणाऱ्यांनी चित्रपटांच्या अशा सुमारपणामुळे समाजाची खरोखर अधोगती होत असते, याचा विचारच केलेला नसतो. ऋषभही म्हणतो की, 'प्रेक्षक चित्रपटगृहात मनोरंजनासाठी येतो. तेव्हा त्याचे त्याबाबत समाधान व्हायला हवे. मात्र मनोरंजनाचे हे समाधान कोणत्या पॅकेजमधून दिले जाते हे महत्त्वाचे आहे. आणि या चित्रपटात त्याने त्यासाठी निवडलेले माध्यम निव्वळ विलक्षण आहे.'

चित्रपटाच्या ट्रेलरवरून शहरी-आदिवासी संघर्ष आणि संभवत: नक्षल्यांचा सहभाग अशा प्रचाराचा काही भाग आहे का, असे वाटू शकते. मात्र मिठाचा कसलाही खडा न पडता चित्रपट पूर्ण होतो. सध्याच्या वातावरणात नवल वाटावे असा हा प्रकार आहे. कथेशी प्रामाणिक राहण्याचा ऋषभचा प्रयत्न यातून दिसतो.

चित्रपटात ऊर्जा ठासून भरलेली आहे. चित्रपटाचा नायक आयुष्याचे कुठलेही ध्येय नसलेला, व्यसनी, छोट्याशा गोष्टीवरून मारामारी करणारा. तो 'कोण' आहे याची त्याला जराही जाणीव नाही. हे लक्षात घेतले नाही तर मधला भाग आणखी कंटाळवाणा वाटू शकतो.

अनेकदा लोककथांच्या मागे निसर्ग व मनुष्यप्राणी यांचे साहचर्य हा विचार असतो. या लोककथा अनेकदा अतर्क्य वाटतील अशा दंतकथांनी व चमत्कारांनी भरलेल्या असतात. अंधश्रद्धांना उत्तेजन देणाऱ्या असतात असे वाटते. अशा कथा म्हणजे अंधश्रद्धा नव्हेत हा संदेश अंधश्रद्धा निर्मूलनछाप व्यक्तींनी व नास्तिक म्हणवणाऱ्यांनी हेतुपुरस्सर लपवून ठेवत निमशहरी-ग्रामीण भागातील लोकांचे फार मोठे भावनिक नुकसान केले आहे. देश तोडणाऱ्या शक्तींकडून यावरून दुष्प्रचार चालू झालेलाच आहे. आपल्याकडेही गावोगावचे रक्षण करणाऱ्या देवता आहेत. आपल्याकडेही देवराईची संकल्पना आहे. दरवर्षीच्या यात्रांमध्ये भाकीत वर्तवणारे असतात. परंतु याकडे एक कला म्हणून पहात ती सादर करणे महाराष्ट्रात बहुधा फक्त कोकणातच घडताना दिसते. वाढत्या शहरीकरणाचा रेटा आणि आपल्या संस्कृतीबाबतचा न्यूनगंड या साऱ्यामध्ये काय काय लोप पावत आहे याचा हिशोब ठेवणे म्हणजे केवळ अरण्यरुदन ठरत आहे. दक्षिण कर्नाटकात प्रचलित अनेक उत्सवांपैकी भुता कोला (देवतेचा उत्सव) म्हणजे केरळच्या उत्तर भागात अशाच तऱ्हेचा उत्सव थेय्यम (देव) म्हणून साजरा होतो.

चित्रपटात भुता कोलाच्या निमित्ताने कथा पुढे नेली आहे. प्रारंभी व अखेरच्या भागात दाखवलेल्या भुता कोलाच्या सादरीकरणात मुद्दाम केलेला फरक ऋषभ सांगतो. पण ते कळण्यासाठी चित्रपट एक तर पुन्हा पहायला हवा किंवा खालील लिंकमधील त्याची मुलाखत आधी पाहून पहायला हवा.

---

हरलात तरी चालेल; फक्त जिंकणारा स्वतःहून म्हटला पाहिजे,
'हा खेळ आयुष्यातील सर्वात कठीण खेळ होता.'

ऋषभ शेट्टीचा दुहेरी म्हणाव्या अशा भूमिकेतील उत्तम अभिनय ही चित्रपटाची मोठी जमेची बाजू आहे. अखेरच्या थरारक भागातील अभिनय कसा केला, यावर 'ते घडून गेले' एवढेच तो सांगतो. बहुतेक कलाकार नाटचसृष्टीतले असल्यामुळे फार कोणाच्या अभिनयाबाबत शंका नव्हती, असे तो सांगतो.

हा माझ्या मनाचा खेळ आहे की काय कोणास ठाऊक; अखेरच्या थरारक भागामध्ये त्याने टॅरंटिनोचे तंत्र वापरल्यासारखे वाटते. हा भाग असा अतिउच्चदाबाचा आहे आणि त्यातही त्याने अतिशय संयमी पद्धतीने केलेली हाताळणी निव्वळ विलक्षण आहे. अखेरीस त्या देवतेमार्फत जणू सर्व भारतवासीयांसाठीच दिलेल्या संदेशाचे भान या प्रसंगामध्येही ऋषभमधील दिग्दर्शकाने ठेवले आहे. कर्कशपणात कारूण्य एरवी केव्हा पहायला मिळाले असेल कोणास ठाऊक! त्या एका प्रसंगासाठी त्याला मानाचा मुजरा. हा चित्रपटाचा परमोच्चबिंदू आहे. ऋषभने सांगितल्याप्रमाणे या चित्रपटासाठी त्याने कथालेखनाचे नेहमीचे तंत्र बाजूला ठेवत अनेकदा मनातच बनवलेल्या चित्रपटाला साजेसे असे बदल ऐनवेळी घडवून आणले. अन्यथा अखेरचा भाग नेहमीच्या सरधोपटपणातून असा अस्सल जिवंत स्वरूपात उतरवला जाणे अगदीच अशक्य वाटते. कोणाला विकलांगपणामुळे घरातून बाहेर पडणे शक्य नसले तर हरकत नाही. अन्यथा धडधाकट व्यक्तींनी चित्रपटगृहातच पाहण्याचा हा चित्रपट आहे. ओटीटीवर किंवा त्यातही फोनवर चित्रपट पाहणारे कर्मदरिद्री ठरावेत, असा हा अखेरचा सुमारे अर्ध्या तासाचा भाग आहे. कवीला अपेक्षित नसलेला अर्थही वाचक कवितेतून काढू शकतात त्याप्रमाणे लेखक ऋषभला अभिप्रेत आहे की नाही कल्पना नाही; सामान्यातला सामान्यच नव्हे; तर आयुष्य वाया गेलेली व्यक्तीदेखील जेव्हा स्वत:ला ओळखते, तेव्हा केवढे असामान्य काम करून जाते हे दाखवणारा हा अखेरच्या प्रसंगातला 'शब्देविण संवादु' आविष्कार आहे.

कोणी विद्यार्थीदशेतली व्यक्ती पुढे काय करायचे या संभ्रमात असेल, तर या चित्रपटनिर्मितीतून प्रेरणा घेऊन ती याकडे वळण्याचे ठरवू शकेल, इतके सामर्थ्य या चित्रपटात निश्चित आहे. भारतीय संस्कृती एवढ्या प्रभावीपणाने आपल्यासमोर आणण्याचा हा परिणाम असेल. मीदेखील चित्रपट पाहून झाल्यावर चार दिवसांनी हे लिहित आहे. कारण फार भारावून गेल्यावर लिहिणे शक्य होत नाही. अर्थात या उशीरामुळे या चित्रपटातले किती मोती दाखवणे राहून गेले असतील कोणास ठाऊक!

असा चित्रपट सब-टायटल्ससह मूळ भाषेत पाहणे केव्हाही उत्तम. मात्र याची हिंदी आवृत्तीही चांगली आहे. जेथे तुळू संवाद अनिवार्य आहेत, तेथे हिंदी व इंग्रजी सब-टायटल्स अडचण येऊ देत नाहीत. पुण्यात याची कानडी आवृत्ती फार मर्यादित ठिकाणी उपलब्ध आहे.

वाईटातून चांगले कसे घडते याचे ऋषभ शेट्टी हे उत्तम उदाहरण आहे. चित्रपटसृष्टीत नाव करण्यासाठी तो चार वर्षे मुंबईत राहिला. या दरम्यान तेथील प्रथितयश मंडळींचा ड्रायव्हर, ऑफिसबॉय अशी अनेक कामे त्याने केली. पुढे फिल्म एडिटिंगमध्ये रस वाटू लागल्यामुळे त्याने त्या दृष्टीने प्रयत्न सुरू केले. पण सारे निष्फळ ठरले. अखेर कर्नाटकात परतून त्याने स्वत:च प्रयत्न सुरू केले. 'तुम्ही चित्रपटाची हाताळणी नीट केली तर प्रादेशिक हेच सार्वत्रिक (Regional is universal) हे तत्त्व लागू होते' असे तो आग्रहाने सांगतो. 'भारतभर असलेल्या लोककथांचा वापर करायचे ठरले तर चित्रपट भव्यतेबरोबरच आशयघनदेखील ठरतील' असे तो सांगतो.

या मातीतला असलेला अतिशय प्रभावी चित्रपट. 'कांतारा'. जरूर पहा.

**– राजेश कुलकर्णी**
ज्येष्ठ पत्रकार, पुणे

●●●

---

कोणतंही कार्य करण्यापूर्वी क्षणभर थांबा. त्याच्या परिणामाबद्दल विचार करा. त्या नंतर सुरुवात करा.

# परिसर वार्ता

**- संकलित**

## सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी पूर्व प्राथमिक विभाग

९ नोव्हेंबर २०२२ रोजी दिवाळीच्या नंतरची दुसऱ्या सत्राची सुरुवात झाली.

**१४ नोव्हेंबर २०२२ – वेशभूषा दिवस**

भारताचे पहिले पंतप्रधान पंडित नेहरू यांचा जन्मदिवस बालदिन म्हणून साजरा केला जातो या दिवसाच्या अनुशंगाने वेशभूषा दिवसाचे आयोजन केले होते.

- **नर्सरी व ज्यूनियर के.जी. –** कोणताही आरामदायक पोशाख (any comfortable costume)
- **सिनीयर के.जी. –** आपले सहाय्यक (our helpers), आवडती जाहिरात (advertisement) असे विषय देण्यात आले होते. मुलांनी उत्साहाने या उपक्रमात भाग घेतला.

**प्रथम निरीक्षण निकाल –** प्रथम सत्राच्या अखेरीस घेतल्या गेलेल्या प्रथम निरीक्षणाचा (I Observation) निकाल १४ नोव्हेंबरला पालकांना देण्यात आला.

**वार्षिक स्नेहसंमेलन –**

१५ डिसेंबर – माध्यमिक विभाग

१६ डिसेंबर – प्राथमिक विभाग

१७ डिसेंबर – पूर्व प्राथमिक विभाग

नर्सरी, ज्यूनियर व सिनीयरच्या सर्व मुलांचा यात सहभाग होता. स्वागताच्या भाषणापासून दोन कार्यक्रमांच्यामधील निवेदन व आभार प्रदर्शन हे सर्व आमच्या चिमुकल्या विद्यार्थ्यांनी अतिशय आत्मविश्वासाने केले.

मराठी, हिंदी, इंग्रजी तसेच गुजराथी या भाषांतून गाण्यांवर नृत्याचे सुंदर सादरीकरण मुलांनी केले. पालकांनी कार्यक्रमाचा आनंद घेतला व पसंतीची दादही दिली.

**१९ डिसेंबर २०२२ –** संस्कृती कला दर्पण आयोजित आंतरशालेय नृत्य व नाटक स्पर्धेत २०१४ पासून शाळा यात सहभाग घेत आहे. प्रत्येक वर्षी बक्षिसेही मिळवत आहे. यावर्षी ''थंबलिना'' हे नाटुकले या स्पर्धेत सादर झाले. सर्वोकृष्ट लेखिका या पुरस्काराने आमच्या शिक्षिका सौ. योगिता नाईक यांना गौरवण्यात आले. तर सर्वोकृष्ट नायिका हा पुरस्कार थंबलिनाची भूमिका करणाऱ्या चि. आर्वी कुलकर्णी हिने पटकावला.

''गरबा'' हे आमचे नृत्यही या स्पर्धेत सहभागी झाले होते. ज्याला द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले.

**२१ डिसेंबर व २२ डिसेंबर २०२२ – क्रीडादिन**

नर्सरी व ज्यूनियर के.जी. – २१ डिसेंबर सकाळी १०:३० ते दुपारी १२:३०

सिनीयर के.जी. – २२ डिसेंबर १०:३० ते दुपारी १२:३०

या वर्षी ठाणे कॉलेजच्या आवारात याचे आयोजन करण्यात आले होते.

नर्सरी – टोपी घालून पळणे, चेंडू बादलीत टाकून धावणे.

ज्यूनियर – शिक्षकांनी सांगितलेल्या रंगाचा मणी घेऊन धावणे, हुलाहूप रिंग घालून बादली घेवून पळणे.

सिनियर – डोक्यावर वही ठेवून चालणे, नाडी सुईत ओवून पळणे व अडथळ्यांची शर्यत असे खेळ घेण्यात आले.

---

आयुष्यातले काही अपघात हे चांगले असतात! सगळं विसरून नव्याने अस्तित्व निर्माण करण्यासाठी!!

नर्सरी व ज्युनियरच्या सर्व विद्यार्थ्यांना पिगी बॅग तर सिनीयरच्या विद्यार्थ्यांना खेळण्यातील कोडे (cartoon puzzle) बक्षिस म्हणून देण्यात आले.

**२३ डिसेंबर २०२२ – (नाताळ)**

२५ डिसेंबरला जगभरात साजरा होणारा नाताळचा सण शाळेत २३ डिसेंबरला साजरा झाला. मुलांनी लाल/पांढरे अशा रंगांचे कपडे घातले होते. सिनीयरचा कु. शौर्य सावंत हा सांताक्लॉज बनून आला होता. मुलांनी सांताबरोबर नाच, गाण्यांचा आनंद लुटला, केक व वेफर्स असा खाऊ मुलांना या निमित्ताने दिला गेला.

येणाऱ्या इंग्रजी नवीन वर्षाच्या (२०२३) सर्वांना हार्दिक शुभेच्छा !

## जोशी–बेडेकर महाविद्यालय

**पंढरपूर ते घुमान सायकल वारी – एक अनुभव कथन**

जोशी – बेडेकर महाविद्यालयाच्या स्टाफ अकॅडमी तर्फे' "**पंढरपूर ते घुमान सायकल वारी – एक अनुभव कथन**" ह्या विषयावरील ग्रंथपाल प्रा. नारायण बारसे यांच्या अनुभव कथनाचा कार्यक्रम दि. १९ डिसेंबर २०२२ रोजी, सकाळी १०.३० वाजता, कात्यायन सभागृह येथे संपन्न झाला.

महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांच्या हस्ते प्रा. नारायण बारसे यांचा सत्कार करण्यात आला. स्टाफ अकॅडमीच्या प्रमुख डॉ. विमुक्ता राजे यांनी कार्यक्रमाच्या आयोजनाचे उद्दिष्ट सांगत प्रा.नारायण बारसे यांना शुभेच्छा दिल्या.

महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांनी आपले मनोगत व्यक्त करताना प्रा नारायण बारसे यांना शुभेच्छा देत, त्यांच्या प्रवासातील अनुभव नक्कीच आपल्याला प्रेरणा देतील सांगत त्यांच्या पॅशनचे कौतुक केले. सोबतच विद्यार्थ्यांमध्ये सायकलिंगचे वेड निर्माण व्हावे अशी भावना व्यक्त केली.



प्रा. नारायण बारसे यांनी या संपूर्ण प्रवासाचे, त्या २० दिवसांतील प्रवासातील विविध अनुभवांचे गाठोडे सर्वांसमोर उलगडले. सरांनी या सायकल वारीत सहभागी विविध व्यक्तिमत्त्व, प्रवासातील आव्हाने, गंमती-जंमती, घडामोडींचे प्रत्ययकारी दर्शन सर्वांना घडवले. संपूर्ण पंढरपूर ते घुमान हा प्रवास कॅनव्हासवर केवळ मांडलाच नाही तर जणू आपण सर्वच या प्रवासात सहभागी झालो आहोत, हा जिवंतपणा उभा केला. गावांच्या साधर्म्यतेमुळे, आणि गुगल मॅपच्या दिशा दर्शकतेमुळे झालेली गडबड, प्रवासातील अपवादात्मक अपघात घटना, या सोबतच विविध राज्यांमध्ये संत नामदेव यांच्या वरील अफाट प्रेमामुळे सायकल-वारीचे झालेले स्वागत, तेथील संस्कृतींचे दर्शन, लोक-स्वभावातील प्रेमळपणा, त्या-त्या प्रांतातील वेगळेपण या सर्वांची अनुभूती पॉवर पॉइंट प्रेझेंटेशन द्वारे प्रा. नारायण बारसे यांनी करून दिली.

या कार्यक्रमाला जोशी बेडेकर महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक, उपप्राचार्य प्रा. सुभाष शिंदे, उपप्राचार्या डॉ. प्रियंवदा टोकेकर, उपप्राचार्य डॉ. महेश पाटील, कनिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्या संगीता दीक्षित, पर्यवेक्षिका प्रा. छाया कोरे, विभागप्रमुख, समन्वयक, प्राध्यापक, ग्रंथालयीन कर्मचारी उपस्थित होते.

संपूर्ण कार्यक्रमाच्या सूत्रसंचालनाची धुरा प्रा. रुपेश महाडिक यांनी पार पाडली. प्रा. शेफाली कोंडेवार यांनी आयोजनात मदत केली. प्रा. मनीषा ठाकूर यांनी कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाची सांगता पसायदानाने झाली.

## बा. ना. बांदोडकर स्वायत्त विज्ञान महाविद्यालय

विद्या प्रसारक मंडळाच्या बा. ना. बांदोडकर स्वायत्त विज्ञान महाविद्यालयातर्फे मुलुंड येथील वझे केळकर महाविद्यालय आणि मुंबईतील सेंट झेवियर्स महाविद्यालय या दोन महाविद्यालयांबरोबर सामंजस्य करार प्रस्थापित झाला.

### राष्ट्रीय सेवा योजना आणि राष्ट्रीय छात्र सेना उपक्रम

१ डिसेंबर २०२२ रोजी एड्स बद्दल जनजागृती करण्याच्या निमित्ताने राष्ट्रीय सेवा योजना आणि राष्ट्रीय छात्र सेना सेनेच्या स्वयंसेवकांनी ठाणे जिल्हा नागरी रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने पदयात्रा आयोजित केली होती.

राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना आणि समाज कल्याण विभाग संयुक्त विद्यमाने १० डिसेंबर २०२२ रोजी आंतर महाविद्यालयीन पथनाट्याचे आयोजन करण्यात आले होते. नशाबंदी या विषयावर पथनाट्य सादर केले. यामध्ये नऊ महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवला.

राष्ट्रीय छात्र सेनेचा (NCC) निवासी कॅम्प २४ डिसेंबर ते ३१ डिसेंबर २०२२ या कालावधीत बांदोडकर विज्ञान महाविद्यालयामध्ये यशस्वीरित्या संपन्न झाला.

### परिषद पूर्व कार्यशाळा

Applied Mathematics and Statistics या राष्ट्रीय परिषदेच्या तयारी निमित्त ३ डिसेंबर २०२२ रोजी दुसऱ्या परिषद पूर्व कार्यशाळेचे आयोजन गणित आणि संख्याशास्त्र विभागातर्फे करण्यात आले होते. यावेळी डॉ. अन्नपूर्णा, सहयोगी प्राध्यापक, संख्याशास्त्र विभाग, सेंट झेवियर्स स्वायत्त महाविद्यालय मुंबई यांनी Writing Research Paper in Statistics या विषयावर, श्री मंदार भानुसे, विभाग प्रमुख, दूरस्थ शिक्षण विभाग, मुंबई विद्यापीठ यांनी Use of Latex in Research Paperआणि कुमारी तन्झिम शेख, संख्याशास्त्र विभाग यांनी Fuzzy Inventory Model या विषयावर मार्गदर्शन केले.

### वा. ना. बेडेकर व्याख्यानमाला

भौतिकशास्त्र विभागातर्फे १६ डिसेंबर २०२२ रोजी डॉ. वा. ना. बेडेकर व्याख्यानमाले अंतर्गत "Advanced Imaging with the help of Unusual coded Aperture" या विषयावर महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी आणि संशोधक श्री नीतिन दुबे यांनी मार्गदर्शन केले.

### आयएसओ परीक्षण

महाविद्यालयाचा दर्जा उंचावण्याकरिता विविध प्रकारच्या परीक्षणांची आवश्यकता लक्षात घेऊन २२ डिसेंबर २०२२ रोजी श्री नारायण बंक यांना आयएसओ परीक्षणाकरिता महाविद्यालयात आमंत्रित करण्यात आले होते.

### सांस्कृतिक कार्यक्रम

महाविद्यालयाचा वार्षिक सांस्कृतिक कार्यक्रम आकांक्षा २३ डिसेंबर २०२२ रोजी संपन्न झाला. 'पॉटरहेड' या संकल्पनेवर यावर्षीचा सांस्कृतिक कार्यक्रम आधारित केला होता.

### संशोधन स्पर्धा

मुंबई विद्यापीठातर्फे आयोजित आविष्कार या संशोधन स्पर्धेत बांदोडकर विज्ञान महाविद्यालयाच्या चार प्रकल्पांची निवड विद्यापीठ स्तरावर झाली.

---

हल्ली फक्त 'स्वतःला' शोधायला वेळ लागतो, बाकी सगळं Google वर सहज सापडतं.

डॉक्टर व्ही एन ब्रिम्स आणि बांदोडकर स्वायत्त विज्ञान महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने "Art of research paper writing and hands on training on SPSS" या विषयावर तीन दिवसीय कार्यशाळा ८ डिसेंबर ते १० डिसेंबर २०२२ रोजी संपन्न झाली.

## विद्यार्थ्यांचे यश

महाविद्यालयाचा द्वितीय वर्ष विज्ञान शाखेचा विद्यार्थी परमवीर सिंग यांनी अकोला येथे आयोजित महाराष्ट्र बॉक्सिंग फेडरेशन तर्फे आयोजित पुरुष बॉक्सिंग चॅम्पियनशिप यामध्ये कांस्यपदक पटकावले.

कनिष्ठ महाविद्यालयाच्या गटाने पिल्लेई कॉलेज ऑफ इंजिनियरिंग तर्फे आयोजित ''मेकर थान'' या आंतर महाविद्यालयीन स्पर्धेत प्रथम पारितोषिक पटकावले.

## सेवानिवृत्त शिक्षक

२४ डिसेंबर २०२२ रोजी महाविद्यालयातील प्राणीशास्त्र विभागाच्या डॉ पूनम कुर्वे, सहयोगी प्राध्यापक यांचा सेवानिवृत्तीचा कार्यक्रम स्टाफ अकॅडमी तर्फे साजरा करण्यात आला. ३१ डिसेंबर २०२२ रोजी २८ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर डॉक्टर पूनम कुर्वे सेवानिवृत्त झाल्या.




## शिक्षकांचे यश



जिमखाना विभागाच्या सौ. देवयानी लढे यांनी बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातून डॉक्टर शेख मोहम्मद जहागीरदार यांच्या मार्गदर्शनाखाली पीएचडी पदवी संपादन केली. त्यांनी "A study of effectiveness of strength training programme for promotion of fitness and skill ability of volley ball players for boys aged 14 years" या विषयावर आपला प्रबंध सादर केला.



कनिष्ठ महाविद्यालयाचे गणित विभागाचे शिक्षक श्री विनोद थोरात यांनी आंतर महाविद्यालयीन कॅरम स्पर्धेत रजत पदक पटकावले.

रसायनशास्त्र विभागाच्या प्रमुख कु. सायली दप्तरदार यांनी २६ ते ३१ डिसेंबर २०२२ या कालावधीत मुंबई विद्यापीठाच्या 'ह्यूमन रिसोर्स डेव्हलपमेंट सेल' तर्फे आयोजित शॉर्ट टर्म कोर्स यशस्वीरित्या पूर्ण केला.

उपप्राचार्य व वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख डॉ मैत्रेयी साहा; डॉ विंदा मांजरमकर, सहयोगी प्राध्यापक, प्राणीशास्त्र विभाग; डॉ विनोद जमदाडे, सहयोगी प्राध्यापक, वनस्पतीशास्त्र विभाग आणि डॉ अनिता गोस्वामी गिरी, सहयोगी प्राध्यापक, रसायनशास्त्र विभाग यांना प्राध्यापक या पदावर बढती मिळाली.


डॉ मैत्रेयी साहा


डॉ विंदा मांजरमकर


डॉ विनोद जमदाडे


डॉ अनिता गोस्वामी गिरी

आपल्यासाठी कुणीही नसले तरी आपण सर्वांसाठी आहोत, ही सुंदर गोष्ट सुंदर फुलांकडून शिकावी.

**ग्रंथालय विभाग**

ग्रंथालय विभागातर्फे विविध दिन, थोर व्यक्तींच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून, तसेच त्यांच्यावरील माहितीचे प्रदर्शन व पुस्तक प्रदर्शन भरवून साजरे करण्यात आले. ०६ डिसेंबर २०२२ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुण्यतिथी निमित्त प्रा. सुधीर भोसले, सहाय्यक प्राध्यापक यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. ०८ डिसेंबर २०२२ रोजी संत संताजी जगनाडे महाराज जयंती, २२ डिसेंबर २०२२ रोजी श्रीनिवास रामानुजन जयंती आणि २७ डिसेंबर २०२२ रोजी डॉ. भाऊसाहेब ऊर्फ पंजाबराव देशमुख जयंती साजरी करण्यात आली.



**अभ्यास भेट**

१३ डिसेंबर २०२२ रोजी सी. डी. देशमुख इन्स्टिट्यूट फॉर ॲडमिनिस्ट्रेटिव्ह स्टडी येथे कनिष्ठ महाविद्यालयाचे विद्यार्थी व प्राचार्य डॉक्टर मोजेस कोलेट यांनी भेट दिली. प्रशासकीय सेवेत आपले करिअर करू पाहणाऱ्या इच्छुक विद्यार्थ्यांचा या भेटीत सहभाग होता.



**विद्या प्रसारक मंडळाचे**
**ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय**

**०३ सप्टेंबर, २०२२ :** सत्र – एक आणि सत्र – दोनच्या पुनर्मूल्यांकनाचे निकाल जाहीर झाले.

**२४ सप्टेंबर २०२२ :** या वर्षी विद्या प्रसारक मंडळचे ठा.म.पा. विधी महाविद्यालय, ठाणे स्थापनेचे ५० वे वर्ष साजरे केले. अनेक मान्यवर माजी विद्यार्थ्यांसह कॉलेज पुढे जात आहे; सुवर्णमहोत्सवी वर्षाच्या स्मरणार्थ महाविद्यालयाने डिजिटल/ई – स्मरणिका तयार केली आहे. हे आमच्या महाविद्यालयाच्या वेबसाइटवर अपलोड केले आहे. हे यशस्वी करण्यासाठी प्रभारी प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार, इतर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी खूप मेहनत घेतली. महाविद्यालयाने या संधीद्वारे आमचे पाचव्या सत्राचे (तृतीय वर्ष) विद्यार्थी श्री. गणेश गोशीकोंडा आणि २०२१-२२ उत्तीर्ण विद्यार्थी श्री. राजेश ढलपे यांचे अथक तांत्रिक सहकार्याबद्दल विशेष आभार मानले आहेत. स्मरणिकेचे विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष, डॉ. विजय बेडेकर सर यांनी खूप कौतुक केले आणि विद्यार्थ्यांनाही खूप आवडले.

**२ ऑक्टोबर २०२२ :** विद्या प्रसारक मंडळचे सेवार्थी माननीय अध्यक्ष डॉ. विजय बेडेकर, यांना त्यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त सन्मानित करण्यात आले. थोरले बाजीराव पेशवे सभागृहात समाजोपयोगी अमृत वंदन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. आमच्या माननीय अध्यक्षांना कोटी प्रणाम.



**सत्र – एक विद्यापीठ के टी परीक्षा** – सत्र – एक विद्यापीठ के टी परीक्षा ४, ७, १२ आणि १४ ऑक्टोबर २०२२ रोजी सकाळी ११.०० ते १.०० या वेळेत घेण्यात आल्या. १७ ऑक्टोबर २०२२ रोजी प्रात्यक्षिक प्रशिक्षण परीक्षा घेण्यात आली.

तो रामाचा प्रसाद पण खातो, तो रहीमची खीर पण खातो;
'अरे, तो भुकेला आहे यार, त्याला कुठे धर्म कळतो?'

**सत्र – दोन विद्यापीठ परीक्षा –** ६, ११, १३, १५ ऑक्टोबर २०२२ रोजी दुपारी ११ ते १ दरम्यान आयोजित करण्यात आली होती.

**ॲड ऑन सर्टिफिकेट प्रोग्राम –** परीक्षा आणि प्रोजेक्ट सबमिशन १८ ऑक्टोबर २०२२ रोजी संध्याकाळी ६ ते ८ दरम्यान होते.

**परिसर स्वच्छता मोहीम :** विद्या प्रसारक मंडळाच्या विविध महाविद्यालयांनी आपला परिसर स्वच्छ ठेवण्याची मोहीम हाती घेतली आहे. ११ ऑक्टोबर २०२२ ते ११ नोव्हेंबर २०२२ या कालावधीत ही मोहीम राबविण्याची विधी महाविद्यालयाची जबाबदारी होती. आमच्या सर्व अध्यापन आणि अशैक्षणिक प्राध्यापकांना वेळापत्रकानुसार या मोहिमेचे नेतृत्व करण्यासाठी नियुक्त करण्यात आले होते. आमच्या विद्यार्थ्यांसह शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी या उपक्रमात आनंदाने भाग घेतला.



**सत्र – तीनचे अभिमुखता व्याख्यान : सत्र –** तीनचे व्याख्यान दुसऱ्या वर्षाला प्रवेश न घेताही सुरू करण्यात आले होते. विद्यार्थ्यांचे आगामी सत्रासाठी जे विषय शिकणार आहेत त्याविषयी मार्गदर्शन करून त्यांचे स्वागत करण्यात आले. त्यासाठी आम्ही १९, २०, २७, २८, ३१ ऑक्टोबर २०२२ रोजी विषयनिहाय अभिमुखता व्याख्याने आयोजित केली होती. विद्यार्थ्यांना अभ्यासक्रम, अंतर्गत मूल्यांकनाची आवश्यकता आणि सत्र – तीनच्या अभ्यासक्रमाची निष्पत्ती, चार मुख्य अभ्यासक्रम आणि एक लागू घटक अभ्यासक्रम या बद्दल सांगण्यात आले.

**सत्र – तीनचे अभ्यासक्रम अभिमुखता व्याख्यानांचे वेळापत्रक (संध्याकाळी ४.०० ते ७.०० पर्यंत)**

**१९/१०/२०२२ प्रशासकीय कायदा – डॉ. श्रीमती. श्रीविद्या जयकुमार**

**२०/१०/२०२२ मालमत्तेचे हस्तांतरण – मिस. हेतल मिशेरी**

**२७/१०/२०२२ कंपनी कायदा – श्री. यतीन पंडित**

**२८/१०/२०२२ कौटुंबिक कायदा – दोन – श्री. अंबर जोशी**

**३१/१०/२०२२ प्रात्यक्षिक प्रशिक्षण – सहाय्यक प्रा. श्री. विनोद एच वाघ**

**एम पी एस सी परीक्षा –** ८ ऑक्टोबर २०२२ रोजी एमपीएससी परीक्षेसाठी दरवर्षीप्रमाणे आमचे विधी महाविद्यालाला एमपीएससी परीक्षेचे केंद्र होते. आमच्या शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी आदल्या दिवशी म्हणजे ७ ऑक्टोबर २०२२ रोजी अधिकाऱ्यांना क्रमांक टाकण्यासाठी आणि इतर औपचारिकता पूर्ण करण्यासाठी मदत केली. परीक्षा पर्यवेक्षक म्हणून आमच्या कर्मचाऱ्यांना कर्तव्ये सोपवण्यात आली होती. परीक्षा सुरळीत पार पडली.

**डॉ. वा. ना. बेडेकर स्मृती व्याख्यानमाला – ''कारागृह कायदा आणि सुधार''**

विद्या प्रसारक मंडळाचे ठा.म.पा. विधी महाविद्यालय, ठाणे यांनी ठाणे शहरातील दोन राष्ट्रपती पदक विजेते पोलिस अधिकारी यांच्या सत्काराचा कार्यक्रम आयोजित केला होता. प्रांगणातील पाणिनी सभागृह इथे दिनांक ८ ऑगस्ट २०२२ रोजी सायंकाळी ६ वाजता या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. ठाणे मध्यवर्ती कारागृहाचे अधीक्षक श्री. हर्षद अहिरराव यांना नुकतेच 'कारागृह सुधार कार्यासाठी' राष्ट्रपती पदक देण्यात आले, तर नौपाडा पोलिस ठाण्याचे वरीष्ठ पोलिस निरिक्षक श्री. संजय धुमाळ यांना त्यांच्या कामगिरी निमित्त राष्ट्रपती

पदक देण्यात आले होते. याचेच औचित्य साधून हा सत्कार समारंभ व डॉ. वा ना बेडेकर स्मृती व्याख्यानमालेनिमित्त ''कारागृह कायदा आणि सुधार'' या विषयावर श्री. हर्षद अहिरराव यांचे व्याख्यान ठेवण्यात आले होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. विजय बेडेकर होते. अध्यक्षीय मनोगतामध्ये डॉ. बेडेकरांनी नागरिकांना कायदा पाळण्याचे आवाहन केले. जर नागरिकांनी कायदा पाळला तर आपोआपच पोलिसांवरचा ताण कमी होऊन गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्यांना आळा घालण्यास पोलिस सक्षम होऊ शकतील.

सत्काराला उत्तर देताना श्री. धुमाळ यांनी त्यांच्या यशाचे श्रेय त्यांच्यासोबत काम करणाऱ्या पोलिस अधिकाऱ्यांना दिले. नौपाड्यामध्ये जेव्हा एका इमारतीला आग लागली होती तेव्हा श्री. धुमाळ यांनी १९ जणांचे प्राण वाचविले होते, तो प्रसंग त्यांनी जिवंत केला. पोलिसांनी सामाजिक जाण आणि कायद्याचे ज्ञान दोन्ही बाळगणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. दुसरे सत्कारमूर्ती श्री. अहिरराव यांनी बंदिवानांचे मानसशास्त्र उलगडून, कारागृहातुन घरी जातांना गुन्हेगार चांगला होऊन कसा जाईल यासाठी सुधार आवश्यक आहे असे सांगितले. त्यांनी स्वत: कारागृहामध्ये केलेल्या सुधारणेचा उल्लेख केला. शिक्षण, आहार, आरोग्य, मोफत विधी सेवा, प्रशिक्षण, प्रार्थना, शिस्त अशा अनेक बाबतीत त्यांनी सुधारणा केल्या आहेत. अनेक बंदी शिक्षा संपवून जेव्हा घरी जातात तेव्हा याच सुधारणा त्यांना चांगला नागरिक होण्यास मदत करतात. गुन्हेगारामध्ये सुधारणा घडवून आणणे हेच कायद्याला अपेक्षित कार्य असल्याचे त्यांनी सांगितले. महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार यांनी कार्यक्रमाची रूपरेषा मांडली आणि पाहुण्यांचे स्वागत केले. सहाय्यक प्राध्यापक विनोद वाघ यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी मंडळाचे सदस्य डॉ. महेश बेडेकर आणि श्री. कयाल उपस्थित होते.




**विशेष चर्चासत्राचे आयोजन**

विद्या प्रसारक मंडळाच्या टिएमसी विधी महाविद्यालयाच्या विधी सहाय्य केंद्राने दिनांक १४ ऑक्टोबर २०२२ रोजी सायंकाळी ६ वाजता प्रांगणातील पाणिनी सभागृहामध्ये 'फौजदारी खटला' या विषयावर एका विशेष चर्चासत्राचे आयोजन केले होते. यामध्ये ठाणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव तथा दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर श्री. ईश्वर सूर्यवंशी, माजी पोलिस उपायुक्त श्री. नागेश लोहार, विशेष सरकारी वकील श्रीमती हेमलता देशमुख व प्रसिद्ध फौजदारी वकील तथा महाराष्ट्र आणि गोवा बार कौन्सिलचे माजी अध्यश्र श्री. गजानन चव्हाण यांनी भाग घेतला.

कार्यक्रमाचे उद्घाटन श्री. सूर्यवंशी यांच्या हस्ते करण्यात आले. फौजदारी खटल्याच्या विविध अंगांवर म्हणजेच तपास, प्रॉसीक्युशन, बचाव आणि न्यायनिर्णय यावर एकाच वेळी चर्चा करणे ही फारच चांगली संकल्पना असल्याचे त्यांनी सांगितले.

तपास या विषयावर बोलताना श्री. लोहार यांनी फौजदारी प्रक्रिया संहितेनुसार पोलिसांनी कसा तपास करायला हवा, कशाप्रकारे पुरावे गोळा करायला हवेत याविषयी स्वतःच्या अनुभवाचे दाखले देत समजावून सांगितले. तपास अधिकाऱ्यास कायद्याचे व प्रक्रियेचे ज्ञान नसल्यास त्याने केलेल्या तपासातून त्रुटी शोधून बचाव पक्ष आरोपीला निर्दोष सोडण्याचा प्रयत्न करतात.

श्री. लोहार यांनी टाडा, पोटा, मोक्का अशा गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्यांचा देखील तपास केल्याचे सांगितले. १९९३ मध्ये मुंबईत घडलेल्या बॉम्ब ब्लास्टमध्ये श्री. लोहार हे तपास अधिकारी होते.

प्रॉसीक्युशन बद्दल बोलताना विशेष सरकारी वकील श्रीमती देशमुख यांनी सरकारी वकिलांची भूमिका स्पष्ट केली. सरकारी वकिलाचे प्रथम कर्तव्य हे न्यायालयास न्यादानासाठी सहकार्य करणे असल्याचे त्यांनी सांगितले. स्वत: चालवलेल्या अनेक खटल्यांचा संदर्भ देऊन त्यांनी सरकारी वकिलांचे कर्तव्य विशद केले.

बचाव पक्षाची भूमिका स्पष्ट करताना श्री. चव्हाण यांनी सांगितले की, वकीलांना समाजात असलेल्या प्रत्येक विषयाची माहिती असणे आवश्यक आहे. पोलिसांनी केलेला तपास व त्यातील त्रुटी समजून घेणे हे बचाव पक्षाचे पहिले काम असते. कायद्याच्या चौकटीत राहून वकिलांनी आरोपीचा बचाव केला पाहिजे. बचाव करणे याचा अर्थ 'काहीही करून आरोपीला वाचविणे' असा नसून आरोपीबाबत कायद्याच्या चौकटीत राहून जे काही करणे शक्य आहे ते करणे असा आहे. हे करीत असताना बचाव पक्षाच्या वकिलांना याचेही भान असले पाहिजे की, ते देखील न्यायव्यवस्थेचे भाग आहेत आणि म्हणून न्यायदान करताना काही अडथळे निर्माण होतील असे कृत्य त्यांनी करू नये.

न्यायनिर्णय या विषयावर बोलतांना श्री. सूर्यवंशी यांनी असे सांगितले की, न्यायाधीश कधीही पूर्वग्रह ठेवून पुरावे किंवा वादविवाद ऐकत नाही. तपास अधिकारी, सरकारी वकील आणि बचाव पक्ष या सर्वांना त्यांची त्यांची बाजू असते पण न्यायाधिशास फक्त कायद्याचीच बाजू असते; त्यामुळे फक्त कायद्याच्या नियमाला अनुसरून जे पुरावे, जे तथ्य, जी वस्तुस्थिती, जो कायदा लागू आणि मान्य आहे त्याचाच विचार करून निर्णय करणे अपेक्षित असते. न्यायदान करणे हे वाटते तेवढे सोपे कृत्य नाही. त्यांनी विद्यार्थ्यांनाही न्यायाधीश होण्यासाठी मेहनत घेण्याचे आवाहन केले.

प्रभारी प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयाकुमार यांनी कार्यक्रमाची रूपरेषा मांडली. महाविद्यालय प्रत्येक शुक्रवारी व शनिवारी सायंकाळी ४ ते ६ या वेळेत गरीब व गरजु लोकांना मोफत विधी सल्ला देत असते, नागरिकांनी त्याचा लाभ घ्यावा असे आवाहन त्यांनी यावेळी केले. विधी सहाय्य केंद्रांचे प्रभारी प्रा. विनोद वाघ यांनी सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन केले.



**नॅक री ॲक्रिडेशन –** १४ ऑक्टोबर २०२२ ला विधी महाविद्यालयाच्या विधी महाविद्यालय समितीची बैठक झाली. आम्ही आमच्या विधी महाविद्यालयाच्या नॅक री ॲक्रिडेशनच्या सूचना जवळपास १८ वर्षांच्या कालावधीनंतर स्वीकारल्या. त्याच व्हीपीएम टीएमसी लॉ कॉलेज ठाणे ने १८ ऑक्टोबर २०२२ रोजी नॅक पोर्टलमध्ये नोंदणी केली आणि काम सुरू केले.

**प्रथम वर्ष विधीची प्रवेश प्रक्रिया –** २२ ऑक्टोबर २०२२ पासून तीन वर्ष विधीच्या सामाईक प्रवेश प्रक्रियेची पहिली फेरी सुरू झाली आणि २९ ऑक्टोबर २०२२ पर्यंत चालली. प्रवेशाची जवाबदारी प्रभारी प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार, सहाय्यक. प्रा. हेतल मिशेरी, ग्रंथपाल श्रीमती शीतल सोनावणे व सर्व शिक्षकेतर कर्मचारी यांनी घेतली. पहिल्या फेरीत आम्ही १६२ प्रवेश पूर्ण केले.

**२८ ऑक्टोबर २०२२** श्रीमती समिता पेट्रो ह्या महाविद्यालयात लिपिक म्हणून रुजू झाल्या.

**कायदेशीर जागरूकता कार्यक्रम –** ३१ ऑक्टोबर २०२२ ठाणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाची बैठक ठाणे न्यायालयातील विधी सहाय्य विभागामध्ये पार पडली. प्राधिकरणाचे सदस्य म्हणून प्रभारी प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार या बैठकीला उपस्थित होत्या. राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणाने घोषित केल्यानुसार ३१ ऑक्टोबर २०२२ पासून सुरू होणाऱ्या १५ दिवसांच्या कायदेशीर जागरूकता कार्यक्रमाबाबत ही बैठक होती.

**युनिटी रन –** ३१ ऑक्टोबर २०२२ राष्ट्रीय एकता दिवसासाठी 'युनिटी रन' हा दिवस स्वर्गीय श्री सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंती स्मरणार्थ साजरा केला जातो. केंद्र सरकारने युनिटी रन कार्यक्रम जाहीर केला होता. प्रभारी प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी सर्व भारतीयांमध्ये एकता दृढ करण्यासाठी इंग्रजी आणि मराठीत शपथ घेतली; यानंतर विद्यार्थ्यांनी युनिटी रनमध्ये सक्रिय सहभाग घेतला.




**सत्र – ५ ची पूर्वतयारी परीक्षा नोव्हेंबर, २०२२**

नोव्हेंबर, ७, ८, ९ आणि १० सत्र – ५ च्या विद्यार्थ्यांसाठी पूर्वतयारी परीक्षा घेण्यात आल्या.

**वेळापत्रक पुढीलप्रमाणे –**

| दिनांक | सायंकाळी ५.०० ते ७.०० |
|---|---|
| ७ नोव्हेबर, २०२२ | दिवाणी प्रक्रिया संहिता |
| ८ नोव्हेबर, २०२२ | फौजदारी प्रक्रिया संहिता |
| ९ नोव्हेबर, २०२२ | कयद्याचे स्पष्टीकरण |
| १० नोव्हेबर, २०२२ | मानवी हक्क आणि आंतरराष्ट्रीय कायदा |

**विद्यापीठाच्या परीक्षेचे वेळापत्रक सत्र – ६**

| दिनांक | संध्याकाळचे सत्र दुपारी २.३० ते सायं. ४.३० पर्यंत |
|---|---|
| बुधवार, नोव्हेंबर ०९, २०२२ | कॉंफ्लिक्ट ऑफ लॉ |
| शुक्रवार, नोव्हेंबर ११, २०२२ | लॉ अँड मेडिसिन |
| मंगळवार, नोव्हेंबर १५, २०२२ | लवाद आणि समेट अधिनियम |
| गुरुवार, नोव्हेंबर १७, २०२२ | पुरावा कायदा |
| शनिवार, नोव्हेंबर १९, २०२२ | विमा कायदा |
| मंगळवार, नोव्हेंबर २२, २०२२ | बौद्धिक संपदेचा कायदा |
| गुरुवार, नोव्हेंबर २४, २०२२ | बँकिंग कायदा |
| सोमवार, नोव्हेंबर २८, २०२२ | महिला व बाल कायदा |

**११ नोव्हेंबर २०२२ –** मान्यताप्राप्त नसलेल्या महाविद्यालयांसाठी पूर्ण दिवसाच्या परिषदेला प्रभारी प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार ह्या उपस्थित होत्या. महाविद्यालयांना नॅक करणे बंधनकारक आहे याबाबत मार्गदर्शन होते. यावेळी राज्यातील विविध महाविद्यालयांचे प्राचार्य उपस्थित होते. माननीय शिक्षण मंत्री, प्रधान सचिव, DHE चे संचालक आणि सहसंचालक पनवेल यांनी संबोधित केले. मुंबई विद्यापीठाच्या 'मानव संसाधन विकास कक्षा'ने या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

**प्रभातफेरी –** १३ नोव्हेंबर २०२२ ठाणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरण आणि विधी महाविद्यालयांनी ठाणे न्यायालय परिसरातून प्रभातफेरीचे आयोजन केले होते.

वेळ पण शिकवते, गुरू पण शिकवतात; दोघात फरक फक्त इतकाच आहे की गुरू शिकवून परीक्षा घेतात आणि वेळ मात्र परीक्षा घेऊन शिकवते.

रॅलीमध्ये व्हीपीएम टीएमसी लॉ कॉलेजसह इतर विधी महाविद्यालयाने भाग घेतला. विधी सहाय्यता कक्षाचे प्रभारी म्हणून सहाय्यक प्रा. विनोद एच वाघ यांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित केले आणि काही पथनाट्ये सादर करण्यासह रॅलीचा भाग होण्यासाठी प्रेरित केले. विद्यार्थ्यांनी गट तयार केले आणि 'घरगुती हिंसाचार, मोफत कायदेशीर मदत आणि सर्व गरजूंना मोफत कायदेशीर मदत कशी उपलब्ध आहे?' या विषयांवर जनजागृती करण्यासाठी दोन पथनाट्ये सादर केली. कार्यक्रमाचे उद्घाटन ठाणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे माननीय पीडीजे श्री. अभय मंत्री आणि माननीय सदस्य सचिव श्री. सूर्यवंशी यांच्या हस्ते, तसेच विविध विधी महाविद्यालयांच्या प्राचार्यां समवेत करण्यात आले.



**१५ नोव्हेंबर २०२२ –** सहाय्यक प्राध्यापक श्रीमती कृष्णा कामत या पूर्णवेळ प्राध्यापक म्हणून विधी महाविद्यालयामध्ये रुजू झाल्या.

**१९ नोव्हेंबर २०२२ –** रिअल इस्टेट या कायद्यांमध्ये ॲड ऑन सर्टिफिकेट प्रोग्रामचे उद्घाटन संध्याकाळी ७.०० वाजता मूट कोर्ट हॉलमध्ये झाले. विद्यार्थी रिअल इस्टेट कायद्यांवरील प्रमाणपत्र कार्यक्रमाच्या उद्घाटनासाठी उपस्थित होते. प्रभारी प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार यांच्या उपस्थितीत माजी विद्यार्थी ज्येष्ठ ॲड. आशिष गोगटे व प्रमाणपत्र कार्यक्रमासाठी प्रमुख साधन व्यक्ती ॲड. दीपक शेगोकार यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन झाले.



**राष्ट्रीय संविधान दिन –** २६ नोव्हेंबर, २०२२ रोजी भारतात भारतीय संविधानाचा स्वीकार केल्याच्या स्मरणार्थ, विद्या प्रसारक मंडळांच्या ठा.म.पा. विधी महाविद्यालयाच्या विधी सहाय्य कक्षाने, ठाणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांच्या मार्गदर्शनाखाली शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना, 'आपल्या जीवनात देशाच्या दस्तऐवजाचे महत्त्व' याविषयी जागरूक करण्याची व्यवस्था केली. आमच्या विद्यार्थ्यांनी ४ शाळांना भेटी दिल्या –

## राष्ट्रीय संविधान दिन कार्यक्रमाद्वारे कायदेविषयक सहाय्य जनजागृती

२४ नोव्हेंबर २०२२ रोजी झालेल्या बैठकीच्या अनुषंगाने प्रभारी प्राचार्य डॉ. श्रीविद्या जयकुमार यांच्या अध्यक्षतेखाली सहाय्यक प्रा. विनोद वाघ आणि प्रा. कृष्णा कामथ यांनी कायदेशीर मदत जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्याचा संकल्प केला होता.

संविधान दिनानिमित्त (संविधान दिवस) जो राष्ट्रीय कायदा दिवस म्हणून ओळखला जातो, त्यानिमित्ताने जिल्हा विधी सेवा प्राधिकरण ठाणे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्या प्रसारक मंडळाच्या ठामपा विधी महाविद्यालयाच्या विधी सहाय्यता कक्षाने शालेय विद्यार्थ्यांना आपल्या देशाच्या जिवंत दस्तऐवजाचे महत्त्व, ''भारतीय संविधान'' याबाबत जागरूक केले.

आमच्या महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी गट करून ठाण्यातील विविध शाळांना भेट दिली. मुख्याध्यापक/

हातांच्या रेषांवर नशीब शोधण्यापेक्षा हातांचा योग्य तो वापर करून नशीब घडवायला शिका.

उपप्राचार्य यांची भेट घेतली आणि या दिवसाचे महत्त्व लक्षात घेऊन त्यांना संविधानाची प्रत दिली. विद्यार्थी स्वयंसेवकांनी शाळेतील विद्यार्थ्यांनाही भेटून आपल्या संविधानाचे महत्त्व समजावून सांगितले. आपल्या संविधानाने आपल्याला दिलेले मूलभूत हक्क, कर्तव्ये आणि उपाय याबद्दल जागरुकता निर्माण करण्याबरोबरच प्रस्तावना-वाचन करण्यात आले.

सत्राच्या शेवटी सर्व शालेय विद्यार्थ्यांना त्यांच्या शिक्षकांसह जिल्हा विधी सेवा प्राधिकरण ठाणे बद्दल माहिती देण्यात आली, जे समुपदेशन आणि कायदेशीर सल्ल्याच्या स्वरूपात मोफत आणि सक्षम कायदेशीर मदत, तसेच प्रकरणे चालवताना मोफत कायदेशीर सेवा प्रदान करते.

**पुढील शाळांना भेट दिल्या :-**

१) ठा म पा  शाळा क्रमांक २० वर्तक नगर, ठाणे

२) मंगला हायस्कूल, ठाणे

३) व्हीपीएमचे सौ. ए.के. जोशी इंग्लिश मीडियम स्कूल, ठाणे

४) भारत इंग्लिश हायस्कूल आणि कनिष्ठ महाविद्यालय, ठाणे

सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांची नावे पुढील प्रमाणे:-

१) मिहीर कोळेकर

२) अक्षय राऊत

३) सायली शिंदे

४) अश्विनी खरात

५) हर्षद वड

६) सूरज कधने

७) फरहीन पठाण

८) वृषाली चांदे

९) रिश्वी चौबे

१०) सौरभ तांबे

११) सायली सावंत

१२) पूर्वा मोंडकर

१३) प्रतीक जगताप

१४) मनिषा झिटे

१५) देवयानी पवार

१६) प्रेमा माधवी



१) **२६ नोव्हेंबर २०२२** रोजी, विद्या प्रसारक मंडळाच्या ठा.म.पा. विधी महाविद्यालय, ठाणे यांनी भारतीय संविधान स्वीकारल्याच्या स्मरणार्थ राष्ट्रीय संविधान दिन साजरा केला. या दिवसाचे महत्त्व लक्षात घेऊन, माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या प्रमुख निकालांवरील सादरीकरण स्पर्धा मूट कोर्ट हॉलमध्ये सायंकाळी ५.३० वाजता आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेचे परीक्षक प्रा. यतीन पंडित होते व त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सहाय्यक प्रा. कृष्णा कामत ह्यानी कार्यक्रमाचे काम पहिले.

**सहभागींची यादी:-** १. निकिता तलेशा

२. देवयानी पवार

३. रेचेल डिसूझा

४. मिहीर कोलेकर

५. रामुलु जनमंची

६. अश्विनी खरात

७. सायली शिंदे

८. प्रेमा माधवी

९. स्वप्नाली चौहान

१०. प्रियदर्शनी लोटणकर

११. कोमल पाटील
१२. जेराल्ड रायवेलूर
१३. नीता मुल्लाकारा
१४. सूरज कढने
१५. राखी वीरकर
१६. मोनिका नेमानी

**विजेत्यांची यादी**

पहिले बक्षीस – नीता मुल्लाकारा
द्वितीय बक्षीस – जेराल्ड रायवेलूर
तृतीय बक्षीस – प्रियदर्शनी लोटणकर
उत्तेजनार्थ बक्षीस – रामुलू जनमंची

श्री गोपी भोसले यांचा 'मोनो' अभिनय चांगलाच गाजला आणि कौतुकही झाले.

२) विद्या प्रसारक मंडळांच्या ठा.म.पा. विधी महाविद्यालय आणि ठाणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांनी संविधान दिनानिमित्त ७ वी, ८ वी आणि ९ वी इयत्तेच्या सौ. ए के जोशी शाळेतील विद्यार्थ्यांसाठी निबंध लेखन आणि चित्रकला स्पर्धा आयोजित केल्या आहेत. निबंध स्पर्धेत ३२ विद्यार्थ्यांनी तर चित्रकला स्पर्धेत २६ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

**निबंध स्पर्धेचा विषय – उत्कृष्टतेसाठी प्रयत्न करणे हे आमचे घटनात्मक कर्तव्य**

**चित्रकला स्पर्धेचा विषय – ''आज्ञापालनाने संविधानाचा सन्मान करा''**

**पारितोषिक विजेते –**

**निबंध स्पर्धा –**

मास्टर चिन्मय देसाई – प्रथम बक्षीस
मास्टर अमोग भिडे – द्वितीय बक्षीस
मास्टर तनिष्क लोन – द्वितीय बक्षीस
मिस जेनिका सावला – तृतीय बक्षीस
मास्टर अर्णव करूळकर – तृतीय बक्षीस

**चित्रकला स्पर्धा**

मिस. गार्गी म्हसकर – प्रथम बक्षीस
मिस. रुजुला पाटील – प्रथम बक्षीस
मास्टर. गंधार सहस्रबुद्धे – द्वितीय बक्षीस
मिस आर्या राऊत – द्वितीय बक्षीस
मिस. श्रावणी भाताडे – तृतीय बक्षीस
मिस. सारा प्रभू – तृतीय बक्षीस

विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व बक्षिसे देण्यात येणार आहेत.

**सामाईक प्रवेश प्रक्रियेची दुसरी फेरी –** प्रथम वर्ष प्रवेशाची दुसरी फेरी २२ नोव्हेंबर २०२२ ते २७ नोव्हेंबर २०२२ पर्यंत सुरू झाली, जी प्रवेश सहाय्यक समिती प्रभारी प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार, प्रा. मिशेरी हेतल ग्रंथपाल, श्रीमती शीतल सोनावणे आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी सुरळीत पार पडली.

**सत्र – एक निकाल जाहीर –** २८ नोव्हेंबर २०२२ व सत्र – एक ६०:४० चा सायंकाळी ५.०० वाजता निकाल जाहीर करण्यात आला.

**डिसेंबर – २०२२ – प्रथम वर्ष विधी प्रवेश**

महाविद्यालयीन फेरी पूर्ण होऊन सर्व २६४ जागा भरल्या गेल्या. ३७ जागांपैकी महाविद्यालयीन फेरीत प्रवेशासाठी २२४६ अर्ज आले होते. विस्तारित फेरीत आमच्याकडे १ जागा होती, ज्यासाठी ७४९ अर्ज प्राप्त झाले होते.

**कार्यशाळा आणि संवेदनशीलता कार्यक्रम**

दिव्यांग व्यक्तींच्या आंतरराष्ट्रीय दिनानिमित्त विद्या प्रसारक मंडळाच्या ठा. म. पा. विधी महाविद्यालय, ठाणे यांनी ३ डिसेंबर, २०२२ रोजी एक कार्यशाळा आणि संवेदनशीलता कार्यक्रम आयोजित केला होता. महाविद्यालयाच्या ग्रंथालयात सदर कार्यक्रम पार पडला

आणि संवेदना कार्यशाळेत मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार व प्रा. हेतल मेशेरी होते.

आमच्या दोन दिव्यांग विद्यार्थिनी रोहिणी साठे आणि श्वेता आमच्या पाहुण्या वक्त्या म्हणून होत्या ज्यांनी त्यांचे, 'वास्तविक जीवनातील अनुभव आणि आव्हाने' वेगळ्या दिव्यांग व्यक्ती म्हणून व्यक्त केली हा एक सन्मान होता. ह्या कार्यक्रमामध्ये दिव्यांग विद्यार्थ्यांचा लेखनिक म्हणून ग्रंथालायतील ग्रंथालय असिस्टंट कु. संपदा साठे हिचे कौतुक करण्यात आले. तसेच सर्व विद्यार्थ्यांनी दिव्यांग विद्यार्थ्यांना मदत करणार असा संकल्प केला.



८ डिसेंबर २०२२ रोजी आयोजित करण्यात आलेल्या विधीबंधाची बैठक गणपूर्ती अभावी पुढे ढकलण्यात आली.

**प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी अभिमुखता कार्यक्रम**

१० डिसेंबर ही प्रवेशाची कटऑफ तारीख होती आणि ऑक्टोबर २०२२ मध्ये पहिल्या फेरीत अधिसूचित केल्यानुसार त्या दिवशी प्रथम वर्ष विधीचे वर्ग सुरू केले. पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांसाठी अभिमुखता कार्यक्रमाची व्यवस्था करण्यात आली होती: विद्यार्थ्यांना महाविद्यालय, महाविद्यालयाचा परिसर, वर्ग, ग्रंथालय, अभ्यासक्रम, शिक्षक, परीक्षा, इंटर्नल्स आणि स्पर्धा यांची ओळख करून देण्यात आली. विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमाची प्रत, इंटर्नल्सवरील सूचना, प्रॅक्टिकल आणि प्रिंट्समधील अभ्यास साहित्य विद्यार्थ्यांना कार्यक्रमाचे परिणाम आणि अभ्यासक्रमाच्या निकालांबद्दल समजावून सांगण्यात आले. प्रभारी प्राचार्य डॉ. श्रीविद्या जयकुमार व वरिष्ठ प्राध्यापक श्री. विनोद एच वाघ यांचे मार्गदर्शनपर भाषण झाले.

**भारतीय संविधानातील नयनरम्य मूल्यांवर विशेष व्याख्यान**

१० डिसेंबर रोजी आपल्या भारतीय संविधानातील नयनरम्य मूल्ये या विषयावर विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. विद्या प्रसारक मंडळाच्या जोशी-बेडेकर महाविद्यालयाचे प्राध्यापक डॉ प्रशांत धर्माधिकारी यांनी मूळ सुलेखन लिखित संविधानातील चित्रांवर सादरीकरणासह व्याख्यान दिले.

**विद्या प्रसारक मंडळाच्या ठा.म.पा. विधी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी डोंबिवलीतील श्री. रा. साठे विद्यालयात मानवी हक्क दिन साजरा केला. (डोंबिवली, दि. १०/१२/२२)**

ठाण्यातील विद्या प्रसारक संस्थेचे ठा.म.पा. विधी महाविद्यालयाच्या दुसऱ्या वर्षातील विद्यार्थ्यांनी छत्रपती शिक्षण मंडळ कल्याणचे डोंबिवलीतील श्री. रा. साठे विद्यालयात मानवी हक्क दिन साजरा केला.

विधी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. सौ. श्रीविद्या जयकुमार, तसेच प्रा. श्री. विनोद वाघ यांनी विधी विद्यार्थ्यांना कायद्याच्या संदर्भात शाळा, महाविद्यालये, सामाजिक संस्था, गृहनिर्माण संस्था, वृद्धाश्रम अशा विविध संस्थांमध्ये जनजागरणासाठी उपक्रम दिला होता. १० डिसेंबर रोजी मानवी हक्क दिनाचे औचित्य साधून डोंबिवलीतील श्री. रा. साठे विद्यालयात इ. ५ वी ते १० वी चे विद्यार्थी व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी शिक्षण हक्क, माहिती अधिकार, संविधानातील मूलभूत हक्क व कर्तव्ये,

महिलांसाठीचे, लहान बालकांचे हक्क व संरक्षण अशा विविध उपयुक्त कायद्यांची माहिती देऊन प्रबोधन केले.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान शाळेच्या मुख्याध्यापिका मा. सुजाता घैसास मॅडम, यांनी भूषविले व विधी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. इ.९ वीच्या विद्यार्थीनींनी उपस्थितांचे स्वागतगीत म्हणून स्वागत केले. यावेळी विकास चव्हाण, दीपक बाऊस्कर, शैलेश लाटकर, प्रियदर्शनी मुळे-लोटनकर, रश्मी देसाई, विशाल चव्हाण, राहुल शिर्के, विनोद आलम, विशाल चव्हाण, समीर भामरे, साक्षी बागा, तानिया बिस्वास, आदित्य लव्हाटे यांनी विविध कायद्यांबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

सदर कार्यक्रमासाठी दयानंद केंद्रे, अजय राठोड, प्रकाश पाटील, सम्राट भद्रे, गौरव गांगुर्डे, नीतिन वाघ, स्नेहा पट्टे इ. दुसऱ्या वर्षातील विधीशाखेतील विद्यार्थी उपस्थित होते.

विधी महाविद्यालयातर्फे मा. सौ. सुजाता घैसास मॅडम यांना संविधानाची प्रत भेट स्वरूपात देण्यात आली. सूत्रसंचालन विधी शाखेतील दुसऱ्या वर्षातील विद्यार्थी व सकाळ विभागाचे सत्रप्रमुख श्री. विकास चव्हाण यांनी केले. विधी महाविद्यालयातर्फे श्री. दीपक बाऊस्कर, यांनी, तर शाळेतर्फे ज्येष्ठ शिक्षक श्री सुरेश महाजन यांनी आभार प्रदर्शन व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील शिक्षक सौ. दीपा कारभळ, सौ. आश्लेषा जाधव, श्री. किशोर लाड, श्री. संदीप काळे, सौ. लोहार यांनी, तर शिक्षकेतर कर्मचाऱ्यामध्ये भगवान जाधव, संतोष थेटे, पाठक मामा यांनी विशेष सहकार्य केले.

आपल्याला सरकारने खूप साऱ्या योजना सोई सुविधा उपचार पद्धती आणि कायदेशीर सुरक्षा हक्क दिले आहेत पण त्याचा योग्य तो लाभ, त्या बद्दल माहिती आणि ह्या सगळ्या सोयी सुविधा योजनांचा उपभोग घेताना आपल्याला कोणी अडवले किंवा नियमांचे उल्लंघन केले तर काय करायचे ह्याबद्दल माहिती देण्यासाठी विद्या प्रसारक मंडळाच्या ठा.म.पा. विधी महाविद्यालयाचे विद्यार्थिनी कु. तन्वी वैद्य, कु. अपेक्षा नामदेव बेलवले आणि सौ. अमिता ठोसर यांनी श्री. मनिष गुरुनाथ शहाणे यांच्या सहकार्याने त्यांच्या स्वामी विवेकानंद बालकाश्रम, येऊर, ठाणे येथे येऊरमधील सात पाड्यांमधल्या आदिवासी समाज व पारंपरिक रहिवासी यांना वैकल्पिक वाद निवारण पद्धती, विधी सेवा प्राधिकरण कायदेविषयक माहिती, वरीष्ठ नागरिकांचे अधिकार, बालकांना मोफत व सक्तीचे शिक्षण अधिकार २००९, कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा २००५, आदिवासी विकास विभागामार्फत विविध योजना, अमली पदार्थ व्यसन नियंत्रण, मानसिक आरोग्य कायदा २०१७, वनहक्क कायदा २००६, आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना, महात्मा जोतिराव फुले जन आरोग्य योजना, तसेच मुख्यमंत्री सहाय्यता निधी इत्यादी बद्दल मार्गदर्शन केले व त्या बद्दलची माहिती पत्रके देण्यात आली, ठाणे जिल्हा रुग्णालयाच्या मानसोपचारतज्ज्ञ डॉ. सुवर्णा माने यांनी तणाव व्यवस्थापनेची माहिती दिली.

आपल्या प्रत्येक अधिकार आणि हक्कासाठी कायदा आहे आणि नियमांचे उल्लंघनासाठी कायद्यात उपाय व योग्य ती शिक्षा दिली आहे. त्या बद्दल माहिती देण्यासाठी, मदत करण्यासाठी ठाणे जिल्हा विधी प्राधिकरण व ठा.म.पा. विधी महाविद्यालयाचे कायदेशीर मदत कक्ष नेहमी आपल्या सेवेसाठी आहे.

**स्पोर्ट्स टर्फ उद्घाटन**

१७ डिसेंबर रोजी सायंकाळी ४.०० वाजता महाविद्यालय प्रांगणामध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाच्या क्रीडा मैदानाचे उद्घाटन करण्यात आले. विद्या प्रसारक मंडळाची व्यवस्थापकीय समिती उपस्थित होती; श्री. उत्तम जोशी यांनी नारळ फोडला आणि डॉ विजय वा.

बेडेकर सरांनी रिबन कापून उद्घाटन केले आणि विद्यार्थ्यांसाठी मैदान समर्पित केले.

२१ डिसेंबर, २०२२ प्रथम वर्ष विधी प्रवेशाची औपचारिकता पूर्ण झाली. २६४ विद्यार्थ्यांचे सर्व प्रवेश तपशील अपलोड करून प्रस्तावाची पुष्टी आणि २६,१००/- इतकी फी भरली.

**नानी पालखीवाला वक्तृत्व**

२५ जानेवारी नानी पालखीवाला वक्तृत्व स्पर्धेसाठी २० डिसेंबर २०२२ रोजी महाविद्यालयाच्या प्रतिनिधीवर निवड फेरीद्वारे निवड करण्यात आली. सात विद्यार्थ्यांनी भाग घेतला. प्रथम वर्ष विधीची विद्यार्थिनी कु. चश्मीरा कौर हिची निवड झाली. कु. क्षितिजा, श्री. धनंजय, कु. निलाक्षी, श्री. रितेश आणि कु. मोनिका यांनी ऑनलाइन निवड फेरीत भाग घेतला. प्रभारी प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार आणि प्राध्यापक श्रीमती कृष्णा कामत यांनी परीक्षक म्हणून काम पहिले.

**ॲड. हेगडे व्याख्यानमाला**

२४ डिसेंबर, २०२२ रोजी सकाळी १०.३० वा विधी फाऊंडेशन आणि विद्या प्रसारक मंडळाच्या ठा.म.पा. विधी महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने ॲड. हेगडे व्याख्यानमालेचे विधी महाविद्यालयाच्या मनु सभागृहात आयोजन केले होते. सकाळी ९.३० ते १०.३०, वकिलाच्या करिअरवर संवादात्मक सत्राद्वारे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते न्या. यू. डी. साळवी (निवृत्त) त्यांनी कार्यक्रमाचे उद्घाटन केले. आनंद विश्व गुरुकुल, ठाणे, जय भगवान कॉलेज, विटावा कळवा, मांजरा चॅरिटेबल ट्रस्ट कॉलेज ऑफ लॉ, ऐरोली-नवी मुंबई येथील विद्यार्थी उपस्थित होते. पहिल्या सत्रात ॲड. श्री. संदेश पाटील यांनी 'बेल' या विषयावर व्याख्यान दिले. फौजदारी प्रक्रिया संहिता, तसेच विशेष कायद्यांतर्गत जामीनाद्वारे दिलेली माहिती आणि चर्चा केलेले खटले, कायदे ही माहिती अत्यंत मौल्यवान होती.

न्यायमूर्ती यू.डी. साळवी (निवृत्त) यांनी तरुण वकिलांना संबोधित करताना, उच्च न्यायालयाचे न्यायाधीश आणि राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाचे सदस्य म्हणून आपला अनुभव सांगितला. ही आयुष्यात एकदाच मिळालेली संधी होती, जी सभागृहातील प्रत्येकाला दिली गेली. विधी फाऊंडेशन तर्फे दोन ज्येष्ठ वकील, ॲड.श्री. गजानन चव्हाण आणि ॲड. श्री. ए. आर. जयमलानी यांना जीवनगौरव पुरस्कार प्रदान केला.

खालील चार विद्यार्थ्यांना त्यांच्या संबंधित महाविद्यालयातील उत्कृष्ट शैक्षणिक सहभागासाठी देखील सन्मानित करण्यात आले.

१. पूर्णिमा भंडारी, विद्या प्रसारक मंडळाच्या ठा.म.पा. विधी महाविद्यालय, ठाणे

२. मितिक्षा फडणवीस, आनंद विश्व गुरुकुल कॉलेज ऑफ लॉ, ठाणे

३. नीता गमरे, जय भगवान कॉलेज, विटावा, कळवा

४. हृषिकेश मुद्देबिहाळकर, मांजरा चॅरिटेबल ट्रस्ट कॉलेज ऑफ लॉ, ऐरोली, नवी मुंबई

विधी फाऊंडेशनतर्फे ॲड. श्री आकाश वारंग, विद्या प्रसारक मंडळाच्या ठा.म.पा. विधी महाविद्यालय, ठाणे माजी विद्यार्थ्याला, यंग इमर्जिंग ॲडव्होकेट पुरस्काराने सन्मानित केले.



### दुसऱ्या सायकलसाठी नॅक सबमिशन

महाविद्यालयाने दुसऱ्या सायकल नॅक मान्यतेसाठी नोंदणी केली आहे. महाविद्यालयाने २०१७-२०१८, २०१८-२०१९ आणि २०१९-२०२० चे वार्षिक गुणवत्ता मूल्यांकन अहवाल सादर केले आहेत. त्यासाठीची प्रक्रिया सुरू आहे.

### वक्तृत्व कौशल्यावरील ऑनलाइन कार्यशाळा

२८ डिसेंबर, २०२२ रोजी दुपारी ३.०० वाजता 'वक्तृत्व कौशल्य' या विषयावर ऑनलाइन कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती ॲड. मिस सोनिया मिश्रा रिसोरर्स पर्सन होत्या.



### प्राणी संरक्षण कायदा बॅच – तीन

प्राणी संरक्षण कायदा बॅच – तीन सप्टेंबर-डिसेंबर, २०२२ ऑनलाइन वर्गासह संपली. २३ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला होता. सादरीकरण आणि परीक्षा त्यांचा निकाल २ जानेवारी, २०२३ रोजी घोषित करण्यात आला. दोन विद्यार्थ्यांनी ओ श्रेणी मध्ये उत्कृष्ट दर्जा प्राप्त केला आहे.

### आपदा मित्र

जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे यांनी आमच्या महाविद्यालयामध्ये दिनांक २० ते ३१ डिसेंबर, २०२२ दरम्यान १०० कॅडेट्स, विद्यार्थी आणि इतर स्वयंसेवकांसाठी आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण आयोजित केले होते. २९ डिसेंबर रोजी सायंकाळी ६.०० वाजता या विस्तार कार्यक्रमात आमच्या कायदेशीर सहाय्यता कक्षाने 'आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५' या विषयावर कार्यशाळेचे आयोजन केले होते. प्रभारी प्राचार्या डॉ. श्रीविध्या जयकुमार आणि श्रीमती कृष्णा कामत संसाधन व्यक्ती होत्या.

प्रथम वर्ष विधीचा विद्यार्थी अमोल शेलार निवडणूक जिंकला असून, तो भिवंडी ग्रामपंचायतीचा सदस्य आहे.



## विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन

### अभिनंदन !! : विद्यार्थी विकास योजना शिष्यवृत्ती



शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनात इंडस्ट्रियल इलेक्ट्रॉनिक्स डिप्लोमा केलेल्या विवेक धलकारी या विद्यार्थ्याला अभियांत्रिकी शिक्षण पूर्ण करण्यासाठी विद्यार्थी विकास योजनेची शिष्यवृत्ती मिळाली आहे. ही शिष्यवृत्ती गुणवत्तापूर्ण पण गरजू विद्यार्थ्यांना आर्थिक मदत देते. विवेक इंडस्ट्रियल इलेक्ट्रॉनिक्स विभागात प्रथम आला असून त्याला ९१.११% गुण मिळाले आहेत.

ठाणे जनता सहकारी बँकेचे माजी कार्यकारी संचालक रवींद्र कर्वे यांनी ही योजना २००५ मध्ये सुरू केली. इंडस्ट्रियल इलेक्ट्रॉनिक्स विभाग प्रमुख डॉ. कीर्ती आगाशे मागील १० वर्षे या संस्थेत मानद समुपदेशक आणि कार्यकारिणी सभासद म्हणून काम करतात.

आतापर्यंत इंडस्ट्रियल इलेक्ट्रॉनिक्स डिप्लोमा केलेल्या पाच विद्यार्थ्यांना ही शिष्यवृत्ती मिळाल्यामुळे त्यांचे संपूर्ण अभियांत्रिकी शिक्षण या शिष्यवृत्तीमुळे मोफत होऊ शकले आहे.

१) ''विद्या प्रसारक मंडळ तंत्रनिकेतन व एडवाईज इन्टरनॅशनल ऑरगनायझेशन'' यांच्या संयुक्तीक विद्यमाने...

"Broaden your International study prospective with experts"

या विषयाच्या अंतर्गत दिनांक ५/१२/२२ रोजी विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनात दुपारी २.३० वाजता कार्यशाळेचे आयोजन केले. तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांनी या कार्यशाळेचा लाभ घेतला.



२) दिनांक ८ डिसेंबर २०२२ रोजी विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनातील ISTE Chapter (2022) च्या वतीने रक्तदान शिबिर आयोजित केले. सदर शिबिर HDFC Bank व महात्मा गांधी Blood Bank यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केले. या शिबिरात तंत्रनिकेतनातील कर्मचारी वर्गाने व विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तरित्या सहभाग घेतला.




३) ५ डिसेंबर २०२२ रोजी, इलेक्ट्रीकल पॉवर सिस्टीम विभागाच्या विद्यार्थ्यांनी 'इंडस्ट्रीयल विझिट' "Adani electricity" 2 x 250 MW (Adani Dahanu Thermal Power Satation) मध्ये आयोजित केली.



४) विद्या प्रसारक मंडळाच्या इन्व्होवेशन सेल्ड (VPM IIC 4.0) ला २०२२ सालासाठी ३.५ स्टार रेटिंग मिळाले. IIC च्या Co-ordinators च्या प्रयत्नाने व विविध कार्यक्रमांमुळे स्टार रेटिंगचे मानकरी ठरले.



५) AICTE MODROBS Grant to Polytechnic

अ) इलेक्ट्रीकल पॉवर सिस्टीम विभागाच्या "Upgradation of power system lab" या प्रकल्पासाठी रु. १२,२२,२५०/- मंजूर करण्यात आले.

सदर प्रकल्पाचे Co-ordinator म्हणून सौ. राजश्री पाटील काम पाहतील.

ब) 'इन्फोरमेशन टेक्नॉलॉजी' विभागाच्या "Develop and upgrade IOT lab" या प्रकल्पाला रु. १४,५९,११५/- ची मान्यता AICTE च्या वतीने देण्यात आली.

सदर प्रकल्पाच्या डॉ. उषा राघवन या Co-ordinater आहेत. सदर दोन्ही प्रकल्प २०२२-२३ रोजी पूर्ण होणे अपेक्षित आहेत.

## डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था, ठाणे

**३ डिसेंबर :** डॉ. नीतिन जोशी यांना ठाकूर इन्स्टिट्यूट येथे शिक्षक निवडीसाठी विषयतज्ज्ञ म्हणून आमंत्रित करण्यात आले.

**३ डिसेंबर :** एम एम एस २०२१-२३ तुकडीचे द्वितीय सत्राचे, अंतर्गत निकाल जाहीर करण्यात आले.

**एम एम एस २०२१-२३ तुकडीचे द्वितीय सत्राचे गुणवंत विद्यार्थी**

| पट क्र. | नाव | द्वितीय सत्राचे एकूण गुण (८०० पैकी) | श्रेणी/ क्रमांक |
|---|---|---|---|
| P54 | जोशी रोहीन | ६४४ | १ |
| V15 | रावले श्रद्धा | ६४४ | १ |
| V39 | कदम तन्वी | ६४३ | २ |
| V37 | सावंत तनया | ६३६ | ३ |

**एम एम एस २०२१-२३ तुकडीचे प्रथम वर्षाचे गुणवंत विद्यार्थी**

| पट क्र. | नाव | प्रथम आणि द्वितीय सत्राचे (१६०० पैकी एकूण गुण) | श्रेणी/ क्रमांक |
|---|---|---|---|
| V39 | कदम तन्वी | १२७२ | १ |
| V15 | रावले श्रद्धा | १२६२ | २ |
| P54 | जोशी रोहीन | १२६२ | २ |
| C07 | घाडी ऐश्वर्या | १२३२ | ३ |

**८ डिसेंबर ते १० डिसेंबर :** वि.प्र म. चे बी.एन. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय (स्वायत्त) आणि डॉ. व्ही.एन. ब्रिम्स यांच्या संयुक्त विद्यमाने ''आर्ट ऑफ रिसर्च पेपर रायटिंग अँड हॅन्ड्स ट्रेनिंग ऑन एस पी एस एस'' या विषयावर ३ दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली. यामध्ये डॉ. स्मिता जपे, डॉ. महेश भानुशाली, डॉ. दिनेश सोनकुळ यांची सत्रे झाली. या कार्यशाळेमध्ये विविध संस्थेतील २५ प्रशिक्षणार्थींनी सहभाग घेतला.



**९ डिसेंबर :** विद्यार्थी विकास समिति तर्फे स्वरांजली २०२२ या सांगीतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.



**१० डिसेंबर :** श्री अंबिका योग कुटीर, ठाणे यांनी आयोजित केलेल्या योग नियंत्रण मंडळाच्या प्रथम स्तरीय योग अभ्यासक्रम सत्र आयोजित करण्यासाठी डॉ. पल्लवी चंदवासकर यांना अतिथी प्रशिक्षक म्हणून आमंत्रित करण्यात आले.



**१४ डिसेंबर :** डॉ व्ही एन ब्रिम्सच्या ई-सेल तर्फे वाधवानी फाऊंडेशन यांच्या सहकार्याने एम एम एस द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी प्रा. विशाल नायर यांचे NEN-IGNITE या अभ्यासक्रमावर आधारित एक सत्र आयोजित करण्यात आले. वाधवानी फाऊंडेशनचे श्री स्वरूप पंड्या, श्री अजय जळकळे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला.



**१५ डिसेंबर :** प्रा. कृष्णकांत लसुणे यांनी पदव्युत्तर पदवी विद्यार्थी (PPG) श्रेणी अंतर्गत आविष्कार संशोधन अधिवेशनात (२०२२-२३) भाग घेतला.

**१६ डिसेंबर :** दुर्गा वेंगुर्लेकर, फिजा आगा, गौरीश चव्हाण, बिनिता प्रधान, निखिल साखरकर या एम.एम.एस. प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी मुंबई विद्यापीठाने आयोजित केलेल्या आविष्कार संशोधन अधिवेशनाच्या (२०२२-२३) विभागीय फेरीत भाग घेतला व ही फेरी पार करण्यात यशस्वी झाले.




**१७ डिसेंबर :** डॉ. नीतिन जोशी व्हीपीएम स्पोर्ट्स अकादमी तर्फे आयोजित नव्या हिरवळ (टर्फ) - क्रीडांगणाच्या उद्घाटन समारंभाला उपस्थित राहिले.

**१७ डिसेंबर :** प्रा. कृष्णकांत लसुणे यांना एमईटी इन्स्टिट्यूट ऑफ पीजीडीएम, एमईटी कॅम्पस, वांद्रे येथे पीजीडीएम विद्यार्थ्यांच्या उन्हाळी प्रकल्पाच्या मुलाखत परीक्षेसाठी परीक्षक म्हणून आमंत्रित करण्यात आले.

**२० डिसेंबर :** डॉ. पल्लवी चंदवासकर यांना VIT (विद्यालंकार इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी) व्यवस्थापन अभ्यास विभाग, NAAC A+ मान्यताप्राप्त संस्थेमध्ये ''कन्झुमर बिहेविअर इन सर्व्हिस मार्केटिंग'' या विषयावर अतिथी सत्र आयोजित करण्यासाठी आमंत्रित करण्यात आले.



**२१ डिसेंबर :** श्री. संजय सपकाळ यांनी ग्रंथालय तर्फे एमएमएस द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी क्रिसिल संशोधन डेटाबेस वापरासाठी अभिमुखता सत्र आयोजित केले.

**२२ डिसेंबर :** डॉ व्ही एन ब्रिम्सच्या आय आय सी समिती तर्फे प्रेसिहोलचे संस्थापक श्री. अयाझ काझी यांच्या सोबत ''टेक्नॉलॉजि, इम्पॅक्ट अँड प्रोग्रेस ऑफ प्रेसिहोलइन द व्हर्टीकल्स ऑफ ऑटोमोटिव्ह, एरोस्पेस अँड डिफेन्स अँड अपॉर्च्युनिटीस अहेड'' या विषयावर एक परिसंवाद आयोजित करण्यात आला.




**२६ डिसेंबर :** डॉ. कांचन यांनी केंब्रिजनेतर्फे प्रदान केलेल्या कम्युनिकेशन प्रोग्रामसाठी नावनोंदणी सुरू केली. ४० विद्यार्थ्यांनी नोंदणी करून त्यांचे प्रशिक्षण सुरू केले आहे. नवीन तुकडीसाठी नावनोंदणीही सुरू झाली आहे.

**२६ डिसेंबर :** प्रा. संदीप मोघे यांनी इनपॉड्सच्या सहकार्याने शिक्षण व्यवस्थापन प्रणाली (LMS) साठी विद्यार्थ्यांचे प्रशिक्षण सत्र आयोजित केले.

**२६ डिसेंबर :** डॉ. महेश भानुशाली यांनी एम एम एस वित्त शाखेच्या २०२१-२३ तुकडीच्या ८ विद्यार्थ्यांना इनसिंक ॲनालिटिक्स (इंडिया) मध्ये फायनानशियल ॲनालिस्ट या पदासह, ४.५ लाखांच्या वार्षिक पगाराच्या रोजगारसंधी उपलब्ध करून दिल्या. सर्वांचे अभिनंदन आणि यशस्वी आणि उज्ज्वल कारकिर्दीसाठी शुभेच्छा.
१. अर्पण भोईर २. उमैर फकीह ३. मोहम्मद झैद मुबीन वाघू ४. योगेश जोहरी ५. रुपाली गावंडळकर ६. आतिश भोईर ७. ऋतुजा फाटक ८. शिवानी जोशी

**२७ डिसेंबर :** डॉ. नीतिन जोशी यांनी नाशिक येथील डॉ. मुंजे इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज येथे ए आय एम एस तर्फे आयोजित केलेल्या 'नवसंकल्पना' या विषयावरील गोलमेज परिषदेला हजर राहिले.

**२९ डिसेंबर :** डॉ व्ही एन ब्रिम्सच्या आय आय सी समिती तर्फे 'डिझाइन थिंकिंग, क्रिटिकल थिंकिंग आणि इनोव्हेशन डिझाईन' या विषयावर, संचालक डॉ. नीतिन जोशी यांच्या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.





**२९ डिसेंबर :** प्रा. संदीप मोघे यांनी इनपॉड्स (LMS) साठी सराव परीक्षेचे आयोजन केले.

**२९ डिसेंबर :** डॉ. कांचन अक्षय केंब्रिजतर्फे केंब्रिज कॅपेबल ॲपच्या वापरासाठी आयोजित केलेल्या प्रशिक्षण कार्यक्रमात सहभागी झाल्या.

**२९ - ३० डिसेंबर :** सी एस आर समितीने दोन दिवस कपडे दान मोहिमेचे आयोजन केले. ''कपडे दान'' मोहिमेसाठी विद्यार्थी, प्राध्यापक आणि शिक्षकेतर सदस्यांनी मिळून चांगला प्रतिसाद दिला व एकूण ७० जणांनी या मोहिमेत कपडे दान केले.



इन्स्पिरा जर्नल तर्फे "Sheaf of case" नावाचे पुस्तक (ISBN 978-93-91932-30-5) प्रकाशित झाले. ज्यामध्ये ब्रिम्सच्या च्या नऊ प्राध्यापक सदस्यांनी त्यांच्या केस स्टडीचे योगदान दिले आहे. पुस्तकाचे संपादन डॉ. नीतिन जोशी, डॉ. गुरुप्रसाद मूर्ती आणि डॉ. स्मिता जपे यांनी केले आहे.




कितीही मोठा पाठिंबा असला तरी यशस्वी तोच होतो, ज्याच्या रक्तातच जिंकण्याची हिंमत आणि लढण्याची धमक असते.

**डॉ. वा.ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था – ग्रंथालयाची माहिती**


- ग्रंथालयातर्फे शैक्षणिक वर्ष २०२२–२०२३ साठी एमएमस च्या प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी आणि द्वितीय वर्षाच्या विध्यार्थ्यांसाठी ओळखपत्रांचे यशस्वीरित्या वाटप करण्यात आले.
- ग्रंथालयातर्फे शैक्षणिक वर्ष २०२२–२०२३ साठी संशोधकांना आपले संशोधन करण्यासाठी जागतिक मान्यताप्राप्त असलेल्या स्कोप्स (SCOPUS) ह्या माहिती संग्रहाचे सदस्यत्व घेण्यात आले आहे.
- ग्रंथालयातर्फे शैक्षणिक वर्ष २०२२–२०२३ सेज या प्रकाशन संस्थेने प्रकाशित केलेले व्यवस्थापन मधील नामांकित ३० नियतकालिकांचे सदस्यतत्व घेण्यात आले आहे. त्यामधील १९ नियतकालिके ही स्कोप्स मध्ये प्रमाणित करण्यात आली आहेत आणि १२ नियतकालिके ही यूजीसीने मान्यता दिलेली आहेत. ही सर्व नियतकालिके आणि माहितीसंग्रह हे ग्रंथालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. opac.vpmthane.org:50400
- ग्रंथालयामार्फत डिसेंबर या महिन्यात एकूण २९ नवीन पुस्तके घेण्यात आली. तसेच सदस्यत्त्व असलेल्या नियतकालिकांमधील ११६ लेखांचे कोहा या ग्रंथालय प्रणाली मध्ये तालिकीकरण करण्यात आलेले आहे. हे सर्व लेख ग्रंथालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.
- डिसेंबर या महिन्यामध्ये सेवकवर्ग आणि विद्यार्थी यांनी मिळून ८१४ पुस्तकांची देवाणघेवाण केली. त्यामध्ये

१) देवघेव केलेली पुस्तके : ३७४
२) नूतनीकरण केलेली पुस्तके : १२५
३) परत आलेली पुस्तके : ३१४

- सर्वोत्कृष्ट ग्रंथालय वापरकर्ता :

डिसेंबर २०२२ मध्ये सर्वाधिक वेळा म्हणजेच २७ वेळा पुस्तके घेणारे सभासद –
१) प्राध्यापक : श्री कृष्णकांत लसुणे
२) विद्यार्थी :
अ) अभिषेक सुरेश गुप्ता – प्रथमवर्ष – वशिष्ठ – १६
ब) संगीता नाना लगड – प्रथमवर्ष – चाणक्य – २६

- निम्ब्स या प्रणालीचा वापर करून EBSCO eBooks या माहिती संग्रहाचा विषयानुसार केलेला वापर.





- प्रकाशकानुसार व विषयानुसार विद्यार्थ्यांनी मोबाईल अँपच्या माध्यमातून केलेला वापर.







- प्राध्यापक व विद्यार्थी यांनी निम्ब्स मध्ये उपलब्ध असलेल्या सर्व माहितीसंग्रहांचा विषयानुसार व प्रकाशकांनुसार केलेला वापर.






- प्राध्यापक व विद्यार्थी यांनी जानेवारी ते डिसेंबर २०२२ या कालावधीमध्ये ग्रंथालयातून कोहा या ग्रंथालयीन प्रणाली मधून देवाणघेवाण केलेल्या पुस्तकांची माहिती.

| month | Issues | Renewals | Returns | Total Transactions |
|---|---|---|---|---|
| January | 61 | 30 | 49 | 141 |
| February | 123 | 44 | 208 | 376 |
| March | 463 | 106 | 447 | 1026 |
| April | 135 | 26 | 300 | 467 |
| May | 69 | 37 | 100 | 207 |
| June | 60 | 23 | 76 | 163 |
| July | 115 | 21 | 113 | 254 |
| August | 114 | 32 | 116 | 266 |
| September | 144 | 35 | 145 | 325 |
| October | 169 | 28 | 230 | 428 |
| November | 142 | 27 | 113 | 283 |
| December | 374 | 125 | 314 | 814 |




●●●

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- ❉ अत्याधुनिक दृक् श्राव्य यंत्रणा
- ❉ वातानुकूलित प्रसन्न वातावरण
- ❉ वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा

अशा सुविधांनी युक्त

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि. प्र. मं. चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

**❉ संपर्क ❉**

कार्यवाह

## विद्या प्रसारक मंडळ

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे – ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक – २५४२६२७०

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे – ४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे–४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे – ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.